| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ९९ वा | मंगळवार दिनांक २३ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लोखंडी तलवार विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:जवळ बाळगली:गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रेखा वय २४ वर्षे, रा.इंदीरानगर झोपडपट्टी भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१८.०६.२०२६ रोजी इंदीरानगर झोपडपट्टी भुम येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेली भुम पोलीसांना मिळून आली. यावर पथकाने नमुद लोखंडी तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-संदेश पंडीत क्षिरसागर, पोलीस नाईक नेमणुक पोलीस ठाणे भुम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम-४,२५अन्वये भुम पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### लोखंडी कोयता बेकायदेशीर रित्या स्वत:जवळ बाळगला; गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत अरबाज वय २७ रा. शालीमार कॉलनी शिंगोली ता. जि. धाराशिव यांनी दि.१८.०६.२०२६ रोजी अॅपे शोरुम समोर धाराशिव ते शिंगोली जाणारे सर्विस रोडवर भारतनगर येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी कोयता ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेली आनंदनगर पोलीसांना मिळून आली. यावर पथकाने नमुद लोखंडी कोयता जप्त करुन फिर्यादी नामे-राजेंद्र रामा राठोड, पोलीस अमंलदार, नेमणुक पोलीस ठाणे आनंदनगर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ अन्वये आनंदनगर पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे

### मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत सोनल रा. शिवाजी महाराज चौक धाराशिव हे दि.१८.०६.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील विना नंबर मोटरसायकल ही वरुन प्रदीप हॉटेल समोर धाराशिव येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले.यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## उस्मानाबाद - लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुक: भाजपाचे बसवराज पाटील यांचा विजय

*** पाटील यांना ८४४ मते तर देशमुख यांना १२५ मते**
*** १४ मते ठरली अवैध**
*** ७१९ मतांनी पाटील यांचा विजय**




धाराशिव (जिमाका ) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद- लातूर- बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या आज २२ जून रोजी झालेल्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांनी विजय मिळविला.पाटील यांना एकूण ८४४ मते मिळाली,तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे महेश माणिकराव देशमुख यांना १२५ मते मिळाली.त्यामुळे बसवराज पाटील यांनी तब्बल ७१९ मतांच्या फरकाने विजय संपादन केला.

मतमोजणीच्या अंतिम निकालानुसार भाजपाच्या बसवराज माधवराव पाटील यांना टेबल क्रमांक १ वर १८४,टेबल क्रमांक २ वर १४४,टेबल क्रमांक ३ वर १९१,टेबल क्रमांक ४ वर १७७ आणि टेबल क्रमांक ५ वर १४८ अशी एकूण ८४४ मते मिळाली.दुसरीकडे महेश माणिकराव देशमुख यांना अनुक्रमे १०,५५,६,२१ आणि ३३ अशी एकूण १२५ मते मिळाली.

मतमोजणीदरम्यान १४ मते अवैध ठरली. त्यामध्ये टेबल क्रमांक १ वर ६,टेबल क्रमांक २ वर १,टेबल क्रमांक ३ वर ३, टेबल क्रमांक ४ वर २ आणि टेबल क्रमांक ५ वर २ अवैध मतांचा समावेश होता.

या निवडणुकीत एकूण ९८३ मतपत्रिका प्राप्त झाल्या. त्यापैकी १४ मते अवैध ठरल्याने ९६९ वैध मते ग्राह्य धरण्यात आली.

निवडून येण्यासाठी आवश्यक कोटा ४८५ मतांचा होता.बसवराज पाटील यांनी हा कोटा सहज पार करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

## वैद्यकीय प्रवेश परीक्षा शांततेत ; धाराशिव येथे RE-NEET ला ९१.५५ टक्के उपस्थिती

### २०७२ पैकी १८९७ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा ; १७५ परीक्षार्थी गैरहजर

धाराशिव,दि.२१ जून (जिमाका) देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ठए-छएएढ (णत्रऋ) २०२६ परीक्षा रविवारी धाराशिव शहरातील पाच केंद्रांवर शांततेत,शिस्तबद्ध आणि पारदर्शक वातावरणात पार पडली. वैद्यकीय क्षेत्रात करिअर घडविण्याचे स्वप्न बाळगलेल्या हजारो विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा निर्णायक असल्याने सकाळपासूनच परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी गर्दी आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (छढ-), नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत घेण्यात आली.दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त वेळ देण्यात आला होता.

जिल्ह्यातील पाच परीक्षा केंद्रांवर एकूण २०७२ परीक्षार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी १८९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली,तर १७५ परीक्षार्थी गैरहजर राहिल्याची नोंद झाली. त्यामुळे जिल्ह्यातील उपस्थितीचे प्रमाण सुमारे ९१.५५ टक्के राहिले.

परीक्षा केंद्रनिहाय पाहता,श्रीपतराव भोसले हायस्कूल,तांबरी विभाग येथे ७२० पैकी ६५७ विद्यार्थी उपस्थित होते,तर ६३ गैरहजर राहिले.रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,बार्शी रोड येथे ४८० पैकी ४४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.शासकीय तंत्रनिकेतन,तुळजापूर रोड येथे ३६० पैकी ३२६,छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,तांबरी विभाग येथे २८८ पैकी २६४,तर जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे २२४ पैकी २०४ विद्यार्थी उपस्थित होते.

परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया सुरळीत आणि गैरप्रकारमुक्त राहावी यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते.सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख, व्हिडिओग्राफी,बायोमेट्रिक पडताळणी, फ्रिस्किंग व्यवस्था,पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती.त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोखर,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,निवासी उपजिल्हाधिकारी व जिल्हा नोडल अधिकारी विद्याचरण कडवकर तसेच सीआरपीएफचे सहाय्यक कमांडंट सिद्धार्थ सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण परीक्षा प्रक्रिया पार पडली.

याशिवाय शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य व NTA नोडल अधिकारी मो.रा.लोखंडे, शिक्षणाधिकारी सुधा साळुंके,भरारी पथक प्रमुख आमोद भुजबळ,पोलीस निरीक्षक, महसूल,आरोग्य,परिवहन,वीज वितरण विभाग तसेच नगर परिषद प्रशासनानेही परीक्षा व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेतील हा महत्त्वाचा टप्पा जिल्ह्यात अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पूर्ण झाल्याने जिल्हा प्रशासनाचे नियोजन आणि विविध यंत्रणांमधील योग्य समन्वय साधून ही परीक्षा घेण्यात आली.

## निरोगी जीवनाचा मंत्र देणारा योग दिन उत्साहात साजरा

### ७०० हून अधिक नागरिकांचा सहभाग



धाराशिव दि.२१ जून (जिमाका) बदलती जीवनशैली,वाढता ताणतणाव आणि विविध आजारांच्या पार्श्वभूमीवर शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्यासाठी योगाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.भारतीय संस्कृतीची ही अमूल्य देणगी आज जगभर स्वीकारली जात असून,निरोगी आणि संतुलित जीवनाचा संदेश देणारा आंतरराष्ट्रीय योग दिन आज २१ जून रोजी रविवारी धाराशिवमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे,विद्यार्थी,खेळाडू,युवक-युवती,नागरिक आणि योग साधक- साधिका अशा विविध स्तरांतील सुमारे ७०० जणांनी एकत्रितपणे योगाभ्यास करत आरोग्यदायी जीवनशैलीचा संकल्प केला.

जिल्हा प्रशासन,जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,आयुष विभाग आणि मेरा युवा भारत केंद्र यांच्या विद्यमाने तसेच पतंजली योग समिती,आर्ट ऑफ लिव्हिंग,धाराशिव डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्ट्स असोसिएशन व क्रीडा भारती यांच्या सहकार्याने सकाळी ७ वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल येथील स्केटिंग मैदानावर हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कवडकर,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी प्रवीण बागल, आंतरराष्ट्रीय खेळाडू गौरी शिंदे,खो-खो वर्ल्ड कप विजेती अश्विनी शिंदे,जिल्हा आयुष अधिकारी प्रिया सोनवणे,शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे,क्रीडा भारतीचे प्रवीण गडदे,आर्ट ऑफ लिव्हिंगचे नंदकिशोर तांबडे तसेच डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्ट्स असोसिएशनचे सहसचिव योगेश थोरबोले यांचे स्वागत करून योग सत्रास प्रारंभ करण्यात आला.

यंदाच्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची (IDY 2026) निरोगी वृद्धत्वासाठी योग (Yoga for Healthy Ageing) ही संकल्पना विशेष ठरली.वाढत्या वयातही शरीर आणि मन सुदृढ ठेवण्यासाठी योग किती उपयुक्त आहे, याचा संदेश या संकल्पनेतून देण्यात आला.मैदानावर एकाच वेळी विविध वयोगटांतील नागरिकांनी योगाभ्यास करत या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीतून प्रतिसाद दिला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कवडकर यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांनी नियमित योगासने करण्याचे आवाहन केले.स्वतःचे आरोग्य डॉक्टरविरहित ठेवण्यासाठी दररोज योगासने करा,नियमित मैदानावर या आणि निरोगी जीवनशैली स्वीकारा, असे सांगत त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले.तसेच आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व विशद करून उपस्थितांकडून ध्यान-धारणा करून घेण्यात आली.

श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, स्केटिंग मैदान येथे पतंजली योग संस्थेचे राम ढेरे यांनी उपस्थितांकडून योगाचे प्रात्यक्षिक करून घेतले.विविध योगासने, त्यांचे आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनात योगाचा समावेश कसा करावा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.मैदानावर उपस्थित शेकडो नागरिकांनी उत्साहाने त्यांच्या सूचनांचे पालन करत योगाभ्यास केला.

या कार्यक्रमास तालुका क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी व अक्षय बिरादार, क्रीडा मार्गदर्शक डिंपल ठाकरे व विश्वास खंदारे,मनपा शिक्षणाधिकारी मल्हारी माने,आकाशवाणीचे जिल्हा प्रतिनिधी देविदास पाठक,मेरा युवा भारत केंद्राचे वैभव लांडगे,पतंजली योग समितीच्या साधनाताई व वैशाली उपासे यांच्यासह सुमारे ७०० योग साधक-साधिका उपस्थित होते.

तसेच शहरातील शासकीय नर्सिंग महाविद्यालय,खोखो खेलो इंडिया सेंटरचे खेळाडू,कर्मवीर बालक मंदिरचे विद्यार्थी, नागरिक,युवक-युवती आणि खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात शेकडो नागरिकांनी एकत्रितपणे केलेला योगाभ्यास,मैदानावर उमटलेली सकारात्मक ऊर्जा आणि निरोगी जीवनाचा घेतलेला संकल्प यामुळे यंदाचा योग दिन विशेष संस्मरणीय ठरला.

राम ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा मार्गदर्शक शुंभागी रोकडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त २३ जून रोजी जिल्हाभर 'एकल महिला दिवस' साजरा होणार

धाराशिव, (जिमाका) राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक, कायदेशीर,आरोग्यविषयक तसेच पुनर्वसनासंदर्भातील प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांच्यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी धोरण तयार करण्याची घोषणा मुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती.त्यानुसार महिला व बाल विकास मंत्री तथा राज्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महिला व बाल विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मसुदा समिती गठित करण्यात आली आहे.

या समितीच्या बैठकीत एकल महिला धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि वास्तवाधिष्ठित करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद,नगरपंचायत आणि ग्रामपंचायत स्तरावर तसेच प्रत्येक गाव,तालुका व प्रभागामध्ये दि.२३ जून २०२६ रोजी 'आंतरराष्ट्रीय विधवा दिन' निमित्त 'एकल महिला दिवस' साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत 'विधवा' या शब्दाऐवजी 'एकल महिला' ही संज्ञा वापरून गाव व शहरातील सर्व एकल महिलांना निमंत्रित करण्यात येणार आहे.त्यांच्या समस्या, अडचणी आणि शासनाकडून अपेक्षित उपाययोजनांबाबत चर्चा आयोजित करण्यात येईल.तसेच महिलांनी उभारलेल्या यशस्वी उपक्रमांची माहिती देऊन त्यांचा सत्कार आणि प्रेरणादायी संवादाचे आयोजन करण्यात येणार आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकल महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येतील. रोजगार,स्वयंरोजगार आणि उद्यमशीलता संधींबाबत मार्गदर्शन केले जाणार असून बचत गटांमध्ये नसलेल्या महिलांना बचत गटांशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

स्त्री-पुरुष समानता,सन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा याबाबत ग्रामसभा व स्थानिक संस्थांच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे.तसेच एकल महिलांच्या समस्या, सूचना आणि मागण्या नोंदवून त्यांचे संकलन करण्यात येईल. आवश्यकतेनुसार समुपदेशन व सहाय्य सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच गाव व शहरांतील एकल महिलांची नोंद,त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती आणि प्रमुख अडचणी यांचे सर्वेक्षणही करण्यात येणार आहे.

या उपक्रमात अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका,महिला बचत गट आणि स्थानिक यंत्रणांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.कार्यक्रमानंतर प्राप्त सूचना व शिफारशींसह सविस्तर अहवाल तयार करून शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था,विभागीय अधिकारी आणि यंत्रणांनी कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करून प्राप्त सूचना व शिफारशी दि.२५ जून २०२६ पर्यंत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,मुख्य प्रशासकीय इमारत,तळमजला, रूम क्रमांक २७ येथे सादर कराव्यात, असे आवाहन प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे यांनी केले आहे.

## कृषी खात्याचा गोंधळ की घोटाळा? भानसगावात ८३ आक्षेपांचा स्फोट; सातबारा एका नावावर, क्षेत्र दुसऱ्याचे!

धाराशिव : (रामेश्वर डोंगरे) राज्यभर २२ कोटी रुपयांच्या कृषी निविष्ठा वाटपातील कथित गैरव्यवहाराची चर्चा सुरू असतानाच आता धाराशिव तालुक्यातील भानसगाव येथून कृषी विभागाच्या कारभाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेतकऱ्यांच्या नावावर झालेल्या निविष्ठा वाटपात तब्बल ८३ आक्षेप नोंदविण्यात आले असून, अनेक प्रकरणांमध्ये एका शेतकऱ्याचा सातबारा, दुसऱ्याच्या नावावर क्षेत्र, तर काही लाभार्थ्यांकडे जमीनच नसल्याचे गंभीर वास्तव उघडकीस येत आहे.

कागदोपत्री लाभार्थी एक आणि प्रत्यक्षात क्षेत्र दुसऱ्याचे, तर काही ठिकाणी सातबारा नसतानाही निविष्ठा मंजूर झाल्याची चर्चा गावोगावी रंगली आहे. त्यामुळे हा केवळ भोंगळ कारभार आहे की मोठा आर्थिक घोटाळा? असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

एका मराठीच्या वृत्तानुसार चौकशी पथके गावोगावी जाऊन शहानिशा करत असून, शेतकऱ्यांकडून माहिती घेतली जात आहे. मात्र, इतके गंभीर प्रकार समोर येऊनही अद्याप दोषींवर ठोस कारवाई झालेली नसल्याने संताप वाढत आहे.

सातबारा नसताना लाभार्थी कसे तयार झाले? एका व्यक्तीच्या नावावर दुसऱ्याचे क्षेत्र कसे दाखवण्यात आले?

**८३ आक्षेपांची जबाबदारी कोण घेणार?**

कृषी खात्यातील या प्रकारामागे नेमके कोणाचे आशीर्वाद आहेत? शेतकऱ्यांच्या हक्काच्या योजनांमध्ये जर अशा पद्धतीने गोंधळ आणि गैरव्यवहार होत असतील, तर हा प्रकार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून शेतकऱ्यांच्या विश्वासाशी केलेला खेळ असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांचा हक्क कोणाच्या घशात? भानसगावातून कृषी खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

### तित्रंज फाट्याजवळुन मोटारसायकल अज्ञाताने चोरली

आंबी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -रमेश वनवे, रा. बेदरवाडी ता. भुम यांची अंदाजे मोटरसायकल ही दि.१९.०६.२०२६ रोजी भुम ते खर्डा जाणारे रोडवर तित्रंज फाट्याजवळुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी रमेश वनवे यांनी दि.२१.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## प्रत्येकांनी जपून वागावे लागेल..

प्रत्येकांनी जपून वागावे लागेल. असे का म्हणावे लागत आहे. यामागील कारणे कोणती असतील याचा विचार केला तर कळून येतील. राज्यात एकतर मान्सुनचे उशीरा आगमन होत आहे. राज्यात अजून पेरण्या झालेल्या नाहीत. राज्यातील बहुतांशी जनतेचा मुख्य व्यवसाय शेती आहे. देशच कृषी प्रधान आहे. असे असताना निसर्ग साथ देत नाही. त्यामुळे शेतकरी कोलमोडला आहे. शेतीचा हा व्यवसाय असला तरी तो निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्ग हा लहरी बनला आहे. वेळवर पाऊस नाही. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. मुळात निसर्गावर शेती व्यवसाय असल्याने नैसर्गिक संकटावर कशा प्रकारे मात करावी या बाबत संशोधनाची गरज आहे. वास्तविक अनेक वर्ष मृगनक्षत्रावर म्हणजे सात जुनला पेरणीस सुरवात होते. या दिवसापासून पाऊस पडत असतो. कधी एवढा पाऊस होतो की, वाफसा होत नाही. म्हणजे जमीनीत पाणी असल्याने पेरणी करणे आवघड होते. यावर्षी उन्हाळाही कठिण गेला व पावुसही हरपला. आता कोठे तुरळक पाऊस पडत आहे. पेरण्या झाल्या नाहीत तर काय स्थिती निर्माण होते हे सर्वांना माहिती आहे. मुळात नैसर्गिक संकटे कशा प्रकारे येतात. यामागील कारणे शोधावी लागतील. त्याच प्रमाणे संकटावर मात करण्याचा सदैव प्रयत्न करावे लागतील. एक लक्षात घेतली पाहिजे की, नैसर्गिक संकटे का येतात, आली तर त्यावर मात कशाप्रकारे केली पाहिजे. संकटावर मात करण्याचे ज्ञान अंगीकारले पाहिजे. यापुर्वी संकटे आली व यापुढेही येण्याची शक्यता आले. पुर्वी एवढी उष्णता नव्हती. पावुस एवढा पडायाचा की, प्रांतविधीला शेंणाच्या गवऱ्या घेवुन जावे लागत. एवढा चिखल होता. आता पिण्याचा प्रश्न गंभीर दिवसेन-दिवस होताना दिसून येत आहे. पावुस पंधरा दिवस लांबला तर चिंता व्यक्त केली जात आहे. त्याच प्रमाणे बाजारात चिंतेचे वातावरण दिसून येत आहे. राज्यातील शेतकऱ्यांनीच काय सर्व जनतेनी नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सक्षम बनले पाहीजे. देशावर जागजिक संकट कोरोणाचे आले. या कोरोणाच्या काळात श्रीमंत ज्याच्याकडे पैसा असून भिकारी बनले. मागून खावे लागले. अनेकांना रस्त्यावर टाकलेले अन्नावर पोट भागवावे लागले. लॉकडावुन काळात अनेकांच्या नौकऱ्या गेल्या. कामाच्या शोधात व गावी जाण्यासाठी शेकडो किमी. पायी चालत जावे लागले. अनेकांना प्राण गमवावे लागले. लॉकडावुन काळ हा भयाण होता. तरी हिंमतीने सरकारच्या मदतीने जीवन जगलो आहोत. आजही कोरोणाचा काळ, लॉकडावुन आठवले की, अंगावर शहारे निर्माण होतात. पुन्हा असा काळ येवू नये. तसेच नुकतेच अमेरिका-इराण दरम्यान युद्ध सुरू असताना पैसे असून स्वयंपाकाचे गॅससिलेंडर मिळत नाही. पेट्रोल-डिझेलचा तुटवडा निर्माण झाला. अमेरिकचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या टॅरिफच्या धोरणाचा फटका बसला. अनेक औषधी महाग झाली. अनेक आयात वस्तूच्या किंमती वाढल्या. युद्धामुळे एक प्रकारे जागतिक संकट निर्माण झाले. यात भारतालाही झळ सोसावी लागली. अजूनही परिस्थिती सुधारली नाही. संकट गोंगावत आहे. देशात वाढलेली महागाईमुळे सर्वसामान्य जनतेला दररोजचे जीवन जगणे कठिण झाले आहे. देशात मोठ्या प्रमाणात बेकारी वाढली आहे. अनेकांच्या हाताला काम नाही. त्याच बरोबर भ्रष्टाचार हा लागलेला कलंक आहे यात ही जनता होरपरली जात आहे. शेतीचे उत्पन्न घटले आहे. देशात सर्वाधिक आत्महत्त्या करणारे हे शेतकरी आहे. हे कृषीप्रधान देशात सर्वात वाईट बाब आहे. व्यापारी, उद्योगपती, कारखानदार, शिक्षण सम्राट, साखर सम्राटांनी आत्महत्त्या केल्या नाहीत तर सर्वाधिक आत्महत्त्या ह्या शेतकरी बांधवाने केल्या आहेत. मुळात कर्जबाजारी करायाचे आम्ही व कर्जमाफीही आम्हीच करायाचे हे दुष्ट चक्र कोठे तरी थांबले पाहिजे. काही झाले तरी देशातील जनतेवर संकटाची मालीका सुरू आहे. अशा संकटावर मात कशाप्रकारे करायाची मोठे आव्हान आहे. त्यामुळे देशातील नागरिकांनी आता संकटावर कशाप्रकारे मात करयाची याचे ज्ञान संपादन केले पाहिजे. सर्वात मोठा प्रयत्न जीवन हे काटसरीने जगण्यास शिकले पाहिजे. नोटाबंदीचा काळ विसारला जावू शकत नाही. आता प्रत्येकांनी प्रत्येक बाबतीत उधळपट्टी करून चालणार नाही. त्याच प्रमाणे विचारपुर्वक वागण्यास शिकले पाहिजे. आपण जो पर्यंत स्वावलंबी बनणार नाहीत, तो पर्यंत शिस्तीने जीवन जगले पाहिजे. भारतीय अनेक बाबतीत परावलंबी आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे. इंधनाबाबत परवलंबी, रासायनिक खते व औषधे, दुर्धर रोगाची औषधे असे दुर्मिळ औषधे हे परदेशातून आयात करावी लागतात. साध्या बॅटऱ्या ज्या स्कुटी किंवा मोबाईलच्या बॅटऱ्या परदेशातील मागवावी लागतात. अॅल्युमिनियम परदेशातून मागवावे लागते. स्वयंपाकाचा गॅस परदेशातून मागवावे लागते. भारत स्वयंपुर्ण कशात आहे हे तरी एकदा जाहीर करावे. भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती आहे तोच संकटात आला आहे. यावर मात करण्यासाठी सिंचनक्षेत्र किती आहे. याबाबत तरतुद किती व खर्च किती. याबाबत यशस्वीता किती यावर चिंतन झाले पाहिजे. कोणतेही संकट आले तरी चिंता निर्माण होते. इंधन, स्वयंपाकाचा गॅस, पावुस लांबला, लॉकडावुन सारखे संकट आले. नोटाबंदीच्यावेळी त्रास झाला यासर्वावर मात करणे आवघड होते. मग आपणास स्वयंपुर्ण व स्वावलंबी व स्वयंपुर्ण कसे समजावे. त्यामुळे आता यापुढे संकट येवू किंवा न येवो. सतत सतर्कता बाळगली पाहिजे. संकटावर मात करण्याची शिकवण घेतली पाहिजे. त्यामुळे प्रत्येकांनी जपून वागले पाहिजे. अजूनही संकटाची मालिका बंद झालेली नाही. संकटे येणार आहे. मान्सून बऱ्याच ठिकाणी आला नाही हे एक संकटच आहे. अन्नधान्याचा तुटवडा झाला तर ते मोठे संकट आहे. सर्व मालास योग्य भाव मात्र शेतीतालास नाही. शेतीमालास भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यास नाही. हे शेतकऱ्यासमोर संकट आहे. मोठया प्रमाणात झाडे तोड करून निसर्गाचे संकट आणणारे कोण आहेत. या बाबीचा विचार यापुढे केला पाहिजे. तरच जीवन सुखकर जाणार आहे. नसता मोठ्या संकट आले तर कसा बचाव कराल? एखादेवेळी सरकारसुद्धा ठोस भुमिका घेत नाही. स्वावलंबनाबाबत निर्णय घेत नाही. त्यामुळे कोराना असो, युद्धामुळे निर्माण झालेले संकट असो, इंधना बरोबर गॅसचे संकट असो, पावसाचे संकट असो यावर मात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मात करणारे शिक्षण दिले पाहिजे. सर्वांनी काटकसरीचे जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रीमंत श्रींमत होत आहेत तर गरीब गरीब, ही दरी कशा प्रकारे कमी करता येईल याचा विचार करावा लागेल. त्यामुळे एकच मंत्र सर्वांनी जपून वागले पाहिजे.

# वर्तमानपत्रात कधीही अन्न गुंडाळू नका:शाईमुळे कर्करोग आणि फूड पॉयझनिंगचा धोका

जर तुम्हाला स्ट्रीट फूड आवडत असेल, तर तुम्ही वर्तमानपत्रात गुंडाळलेले समोसे, वडापाव किंवा जिलेबी खाल्लीच असेल. पण तुम्हाला माहीत आहे का की खाण्यापिण्याच्या वस्तू कधीही वर्तमानपत्रात ठेवू नयेत किंवा गुंडाळू नयेत? वर्तमानपत्राची शाई आरोग्यासाठी धोकादायक आहे. यामुळे यकृत, मूत्रपिंड खराब होऊ शकतात आणि कर्करोगासारखा गंभीर आजारही होऊ शकतो.

अलीकडेच, महाराष्ट्र 'फूड अँड ड्रग डमिनिस्ट्रेशन' (FDA) ने वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ पॅक करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान, ५५ पैकी २६ विक्रेते वर्तमानपत्रात अन्न पॅक करताना आढळले, ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

२०१६ मध्ये जारी केलेल्या 'फूड सेफ्टी स्टँडर्ड अथॉरिटी ऑफ इंडिया' (FSSAI) च्या सल्ल्यानुसार, अन्न वर्तमानपत्रात गुंडाळणे आरोग्यासाठी हानिकारक आहे.




खाद्यपदार्थ स्वच्छ पद्धतीने तयार केले असले तरी, वर्तमानपत्राच्या संपर्कामुळे त्यांची गुणवत्ता आणि सुरक्षितता प्रभावित होऊ शकते.

# मान्सूनमध्ये यूटीआयचा धोका वाढू शकतो: संशोधनानुसार जून ते सप्टेंबर दरम्यान यूटीआयची प्रकरणे १०% पर्यंत वाढतात

मान्सूनमध्ये पोटाचे विकार आणि सर्दी-खोकल्याव्यतिरिक्त महिलांमध्ये युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन (यूटीआय) चे प्रमाण वाढू शकते. नॅशनल लायब्ररी ऑफ सायन्स, अमेरिकेच्या संशोधनानुसार जून ते सप्टेंबर दरम्यान यूटीआयचे प्रमाण सुमारे १०% पर्यंत जास्त दिसून येते. अशा परिस्थितीत, या दिवसांमध्ये यूटीआयचा धोका का वाढतो आणि त्यापासून सुरक्षित कसे राहावे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.



**यूटीआयशी संबंधित ५ सर्वात महत्त्वाच्या गोष्टी**

**लक्षणे:** पोटदुखी आणि वारंवार शौचालयास जाणे

कमी पाणी पिणे, खराब स्वच्छता, गर्भधारणा आणि मधुमेह यामुळे याचा धोका वाढू शकतो. या लक्षणांमध्ये लघवी करताना जळजळ, वेदना, वारंवार शौचालयास जाणे, पोटाच्या खालच्या भागात दुखणे आणि काही प्रकरणांमध्ये ताप व थंडी वाजणे यांचा समावेश आहे.

**हवेतील आर्द्रता आणि ओल्या कपड्यांमुळे धोका वाढतो**

न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिननुसार, बहुतेक प्रकरणांमध्ये यूटीआय एस्चेरिचिया कोलाई नावाच्या बॅक्टेरियामुळे होतो. पावसाळ्यात जास्त आर्द्रता, घाम, जास्त वेळ ओले अंडरगार्मेंट्स घातल्याने बॅक्टेरिया वेगाने वाढू शकतात. कमी पाणी प्यायल्याने शौचालयालाही कमी वेळा जावे लागते, ज्यामुळे बॅक्टेरिया बाहेर पडू शकत नाहीत आणि संसर्गाचा धोका वाढतो.

**स्वच्छता उत्पादनांचा वापर किती योग्य?**

यूटीआय टाळण्यासाठी इंटिमेट वॉशचे फायदे सिद्ध झालेले नाहीत. म्हणून, या उत्पादनांऐवजी फक्त पाणी आणि सौम्य साबणाचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.

**सार्वजनिक शौचालय आणि वेस्टर्न सीटचे सत्य**

सार्वजनिक शौचालयाच्या सीटचा यूटीआयशी काही खास संबंध नाही. खरं तर, शौचालयाच्या घाणेरड्या पृष्ठभागांना स्पर्श केल्याने आणि हात न धुता खाजगी भाग स्वच्छ केल्याने धोका निर्माण होतो.

**या महिलांना असतो**

**सर्वाधिक धोका**

अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिस्टनुसार, गर्भधारणा, मधुमेह आणि रजोनिवृत्तीच्या स्थितीत धोका अधिक असतो.

मधुमेह - यात साखर लघवीतही येऊ लागते, ज्यामुळे जिवाणू सहज वाढू शकतात. मूत्राशय पूर्णपणे रिकामे होत नाही, ज्यामुळे यूटीआय होतो.

गरोदरपणा - या काळात हार्मोनल बदलांमुळे आणि गर्भाशयाच्या वाढत्या आकारामुळे मूत्राशय पूर्णपणे रिकामे होत नाही. यामुळे जिवाणूंना वाढण्याची संधी मिळते.

# विचार सकारात्मक ठेवा, म्हातारपणाची जाणीव होणार नाही:जगप्रसिद्ध पुस्तक 'द पॉवर ऑफ युवर सबकॉन्शियस माइंड' मधून वाचा मनातील ३ गोष्टी

वाढत्या वयातही मन तरुण ठेवता येते का? सकारात्मक विचार खरोखरच जीवनात फरक घडवू शकतात का? जगातील सर्वाधिक वाचल्या जाणाऱ्या प्रेरणादायी पुस्तकांपैकी एक असलेल्या 'द पॉवर ऑफ युवर सबकॉन्शियस माइंड' चे लेखक जोसेफ मर्फी यांचे मत आहे की, अधोमन (ीिललेपीलळॏी ाळपव) एका अशा खजिन्यासारखे आहे, जे वर्तन, आत्मविश्वास आणि जीवनातील अनुभवांवर परिणाम करते. पुस्तकात सांगितलेल्या मनाच्या शक्तीची अशीच तीन रहस्ये वाचा.

१. माणूस मानसिकरित्या आधी म्हातारा होतो, शारीरिकरित्या नंतर

काय शिकावे? जिज्ञासा, शिकण्याची इच्छा आणि भविष्यासाठी उत्साह टिकवून ठेवणारे लोक अनेकदा अधिक समाधानी आणि सक्रिय राहतात.

२. तुमचे अधोमन त्याच विचारांना स्वीकारते, जे तुम्ही वारंवार विचारता

आपले अधोमन योग्य आणि अयोग्य याचा निर्णय घेत नाही. ते केवळ त्याच विचारांना स्वीकारते, ज्याचा आपण वारंवार विचार करतो.

काय शिकावे? स्वतःला निरोगी, आत्मनिर्भर आणि आनंदी पाहून विचार करा. कुटुंबासोबत चांगला वेळ, प्रवास, सेवा कार्य किंवा एखाद्या नवीन ध्येयाची कल्पना करा. हा दृष्टिकोन आत्मविश्वास आणि जीवनाबद्दल उत्साह टिकवून ठेवण्यास मदत करेल.

३. तुम्ही मनात जे चित्र तयार करता, जीवन त्याच दिशेने पुढे जाते

अधोमन (उपचेतन मन) कल्पना आणि वास्तविकतेमध्ये फारसा स्पष्ट फरक करत नाही, म्हणून जीवनात सकारात्मक मानसिक चित्रे महत्त्वाची मानली जातात.

काय शिकावे? जर तुम्ही रोज विचार करत असाल की, आता माझे वय झाले आहे, मी काहीही करू शकत नाही, तर मन त्याच दिशेने काम करेल. पण जर तुम्ही म्हणालात- मी आजही शिकू शकतो, सक्रिय राहू शकतो, तर मन नवीन ऊर्जा निर्माण करू लागते.

# श्रीमंत सोशल मीडियापासून दूर जात आहेत: गोपनीयता नवीन स्टेटस

आजच्या डिजिटल युगात जिथे प्रत्येकजण सोशल मीडियावर दिसण्याच्या स्पर्धेत आहे, तिथेच श्रीमंत आणि प्रभावशाली लोक आपली गोपनीयता आणि खासगीपणाला एक नवीन स्टेटस सिम्बॉल म्हणून स्वीकारत आहेत.

इंटरनेटवर कोणत्याही डिजिटल फुटप्रिंटशिवाय अदृश्य राहणे आणि आपले जीवन गुप्त ठेवणे देखील आधुनिक जगातील खरी 'लक्झरी' बनत आहे. अनेक अतिश्रीमंत लोक सार्वजनिक कार्यक्रम, सोशल मीडिया आणि गुगल सर्चमधून पूर्णपणे गायब आहेत. त्यांच्या कंपन्यांच्या वेबसाइट्स देखील फक्त एका साध्या होल्डिंग पेजसारख्या असतात.

कस्टमाइज्ड हॉलिडे, मेंबर्स ओन्ली क्लबची मागणी वाढली

- श्रीमंत लोक इंटरनेटवरून आपले रेकॉर्ड मिटवण्यासाठी डेटा हटवणाऱ्या कंपन्या, सुरक्षा सल्लागार आणि उपकरणांचा वापर करतात.

- 'डिलीट मी' नावाच्या डेटा हटवणाऱ्या सेवेच्या अतिश्रीमंत ग्राहकांची मागणी ३३०% वाढली. कंपनीने सुमारे ५ कोटी डेटा काढून टाकला आहे.

- ब्रॅड पिट, जॉर्ज क्लूनी आणि एम्मा स्टोन यांसारख्या प्रसिद्ध व्यक्ती त्या मोजक्या लोकांपैकी आहेत, ज्यांनी आपले खासगी सोशल मीडिया अकाउंट्स बनवले नाहीत.

- सिग्नल, विकर आणि एंटरप्राइज-ग्रेड एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्म आता अतिश्रीमंत कुटुंबांच्या दैनंदिन संप्रेषण सवयींचा भाग बनले आहेत.

ब्रँड रणनीतिकार यूजीन हिली याला 'कनेक्टेड प्रायव्हसी' म्हणतात. म्हणजे, डिजिटल जगाचे फायदे घेणे, पण स्वतःला अल्गोरिदम आणि सार्वजनिक निगराणीपासून वाचवून ठेवणे. ते म्हणतात, 'समाजात प्रगती करण्यासाठी आपल्यापैकी अनेकांना ऑनलाइन असणे आवश्यक झाले आहे. पण खरं तर स्टेटस सिम्बॉल ऑफलाइन राहणे हे नाही. खरे स्टेटस सिम्बॉल म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या इतके सशक्त आणि मजबूत असणे की तुम्ही तुमचे ऑनलाइन राहणे तुमच्या इच्छेनुसार ठरवू शकाल. या श्रीमंतांसाठी ऑनलाइन अदृश्य राहणे हा देखील एक वेगळाच रुबाब आहे.

# एकेकाळी मुले कुटुंबाची जबाबदारी होती, आता फक्त पालकांचे नियंत्रण

गेल्या काही दशकांत भारतीय कुटुंबांमध्ये मुलांच्या संगोपनाच्या पद्धतींमध्ये अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. संयुक्त कुटुंबांच्या सामूहिक संगोपनापासून ते आजच्या जेंटल (सौम्य) आणि हायब्रीड (संकरित) पालकत्वापर्यंत, भारतीय पालक-पालिकेंची विचारसरणी, भूमिका आणि प्राधान्यक्रम पूर्णपणे बदलले आहेत.

शिक्षणाला मुलांच्या यशाचा आधार मानणारी कुटुंबे वेगाने कमी होत आहेत. जर्नल ऑफ इमर्जिंग टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेटिव्ह रिसर्चमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, संयुक्त कुटुंबांच्या काळात मुलांना संपूर्ण कुटुंबाची किंवा अगदी परिसराचीही जबाबदारी मानले जात असे. आजोबा-आजी, काका-काकू आणि मोठे भाऊ-बहिणीही त्यांच्या संगोपनात समान भूमिका बजावत असत. ऐतिहासिक आणि धार्मिक महापुरुष प्रेरणास्रोत होते. आज बहुतेक कुटुंबे विभक्त झाली आहेत. शहरीकरण, बदलती कौटुंबिक रचना यांसारख्या गोष्टींनी भारतीय पालकत्वावर खूप परिणाम केला आहे.

**८०% पालक त्यांच्या मुलांचे संगोपन त्यांच्यासारखे व्हावे असे इच्छित नाहीत**

यूगवच्या एका सर्वेक्षणानुसार, फक्त २०% पालकांना वाटते की त्यांनी त्यांच्या मुलांचे संगोपन त्यांच्या पालकांनी त्यांच्यासारखेच करावे. ७५% पालक मुलांवर जास्त कठोरता करण्याऐवजी प्रेम, संयम आणि समजूतदारपणाने समजावणे अधिक प्रभावी मानतात. आता फक्त ४३% पालकच अभ्यासाला मुलांच्या यशाचा मुख्य आधार मानतात, आधी हा आकडा ५४% होता. सीबीएसईच्या एका सर्वेक्षणानुसार, दर ५ पैकी एका पालकाने संगोपनाशी संबंधित आव्हानांबद्दल सांगितले.

**आज मुलांना डिजिटल-वास्तविक जीवनात संतुलन शिकवण्याचे आव्हान**

बाल मानसशास्त्रज्ञ आणि पालकत्व प्रशिक्षक पायल चौरसिया म्हणतात, 'पालकत्व म्हणजे केवळ मुलांना अन्न आणि शिक्षणाची व्यवस्था करून मोठे करणे नाही. पालकत्व म्हणजे मुलांमध्ये कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्ये विकसित करणे आणि त्यांना समाजात एक चांगला नागरिक म्हणून यशस्वी होण्यास मदत करणे होय. गेल्या काही दशकांत बदलत्या काळानुसार पालकत्वाची पद्धतही बदलली आहे. आजच्या पालकांसमोर मुलांना डिजिटल जग आणि वास्तविक जीवन यांच्यात संतुलन राखायला शिकवण्याचे मोठे आव्हान आहे. आता केवळ अभ्यास किंवा शिस्त पुरेसे नाही; मुलांच्या मानसिक आरोग्य, भावनिक बुद्धिमत्ता, आत्मविश्वास आणि सामाजिक कौशल्ये यावरही लक्ष देणे पालकांसाठी महत्त्वाचे आहे.

**काळानुसार बदललेल्या पालकत्वाच्या पद्धती**

**सत्तावादी** – पालक खूप कठोर नियम बनवतात आणि मुलांनी कोणताही प्रश्न न विचारता त्यांचे पालन करावे अशी अपेक्षा करतात.

**आधिकारिक** – पालक कठोर नियम बनवतात खरे, पण मुलांच्या भावनाही ऐकतात आणि त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधतात.

**उदासीन**– यात पालक मुलांना स्वातंत्र्य देतात, पण भावनिक संबंध किंवा मार्गदर्शनाचा अभाव असतो.

**हेलिकॉप्टर** – यात पालक मुलांच्या प्रत्येक कामावर बारकाईने लक्ष ठेवतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी ते नेहमी त्यांच्या आजूबाजूला फिरत असतात.

**परमिसिव** – पालक मुलांचे मित्र बनून राहतात, त्यांच्या मागण्या पूर्ण करतात. नियम खूप कमी किंवा नसतातच.

**टायगर** – यात मुलांकडून शैक्षणिक आणि अतिरिक्त-अभ्यासक्रमाच्या (एक्स्ट्रा-करिकुलर) दोन्ही क्रियाकलापांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रचंड मागणी केली जाते.

**जेंटल/हायब्रिड** – मुलांना शिक्षा करण्याऐवजी योग्य वर्तन शिकवण्यावर, त्यांना प्रोत्साहन देण्यावर आणि चुकांमधून शिकण्याची संधी देण्यावर भर दिला जातो.

**१९९० पूर्वी** – सामूहिक पालकत्वामध्ये मुले नात्यांचे महत्त्व शिकत होती

मुले वाटून घेणे, जुळवून घेणे आणि नात्यांचे महत्त्व नैसर्गिकरित्या शिकत असत. पालकांवरही एकट्याने संगोपन करण्याचा दबाव नसे. तथापि, याला काही मर्यादाही होत्या. वैयक्तिक लक्ष तुलनेने कमी मिळत असे आणि मुलांच्या भावनिक गरजांवर आजच्याइतके लक्ष केंद्रित केले जात नव्हते.

**१९९० नंतर** – वेगाने आलेले बदल

आर्थिक उदारीकरणानंतर शहरीकरण वाढले. एकल कुटुंबे सामान्य होऊ लागली. पालकांचे पूर्ण लक्ष मुलांवर केंद्रित होऊ लागले. २००० च्या दशकात 'हेलिकॉप्टर आणि टायगर पेरेंटिंग' उदयास आली. २०१० नंतर 'परमिसिव्ह पेरेंटिंग'चा काळ आला. कोविड महामारीनंतर जेंटल आणि हायब्रीड पेरेंटिंगची चर्चा वाढली आहे.

# ऑफिसमधील एसीमुळे होऊ शकते डिहायड्रेशन



उष्णता आणि दमट हवामानात ऑफिसमधील AC दिलासा देतो. पण हेच थंड वातावरण डिहायड्रेशनचे कारणही बनू शकते. खरं तर, AC च्या थंडीमुळे तहान कमी लागते, तर शरीर सतत आर्द्रता गमावत राहते.

अशा परिस्थितीत जर तुम्ही वारंवार चहा-कॉफी पीत असाल, तर डिहायड्रेशनचा धोका आणखी वाढतो. याचा परिणाम असा होतो की दिवस संपेपर्यंत डोकेदुखी, थकवा आणि आळस जाणवू लागतो. म्हणून, डिहायड्रेशनची सुरुवातीची लक्षणे ओळखणे आणि वेळेत खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# शरीराला थंड ठेवण्यासाठी हे प्राणायाम करा

कडक उन्हात आणि उष्णतेच्या लाटांमध्ये शरीर थंड ठेवणे हे एका आव्हानापेक्षा कमी नाही. आहारात थंड पदार्थांचा समावेश करण्याव्यतिरिक्त, काही प्राणायाम व्यायाम देखील या काळात शरीर थंड ठेवण्यास मदत करू शकतात. त्यांचा दररोज सराव करा. युरिक ॲसिडपासून सुटका कशी मिळवावी वाढत्या तापमानाचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. वाढत्या तापमानाबरोबर शरीरातील उष्णताही वाढते. यामुळे आजारी पडण्याचा धोका वाढतो. उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटांमुळे डिहायड्रेशन, अशक्तपणा, थकवा, डोकेदुखी आणि चक्कर येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे, शरीर थंड ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
जेव्हा आपण शरीर थंड करण्याबद्दल बोलतो, तेव्हा आपला अर्थ थंड साबणाने आंघोळ करणे, एअर कंडिशनरमध्ये झोपणे किंवा थंड पावडर लावणे असा नसतो; तर आपला अर्थ शरीरातील अंतर्गत उष्णता कमी करणे असा असतो. कडक उन्हात आणि उष्णतेच्या लाटेत शरीर थंड ठेवणे हे एका आव्हानापेक्षा कमी नाही. आपल्या आहारात थंड पदार्थांचा समावेश करण्याव्यतिरिक्त, काही प्राणायाम व्यायाम देखील या काळात शरीर थंड ठेवू शकतात. या व्यायामांचा दररोज सराव करा.

चंद्रभेदी प्राणायाम
हा एक शीतलता देणारा प्राणायाम आहे.
यामुळे शरीर थंड होते.
हे करण्यासाठी सुखासन, पद्मासन किंवा वज्रासनात बसावे .
तुमची पाठ सरळ ठेवा.
अंगठ्याने उजवी नाकपुडी बंद करा.
डाव्या नाकपुडीतून हळूहळू श्वास घ्या.
त्यानंतर डावी नाकपुडी बंद करा आणि उजवी नाकपुडी उघडून हळूहळू श्वास बाहेर सोडा.
ही या प्राणायामाची एक फेरी आहे. तुम्ही याची १०-१५ वेळा पुनरावृत्ती करावी.
यामुळे शरीर थंड होते.
त्यामुळे मानसिक ताण आणि चिडचिड कमी होते आणि चांगली झोप लागण्यास मदत होते.
उन्हाळ्यात शरीराचे अतिरिक्त तापमान नियंत्रित ठेवण्यास यामुळे मदत होते.
-ड्डज ठए-ऊ पुरुषांमधील टेस्टोस्टेरॉन कमी करू शकतात हे ५ पदार्थ , विज्ञान काय सांगते ते जाणून घ्या. अनुलोम-विलोम प्राणायाम
अनुलोम-विलोम प्राणायाममुळे शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो.
शरीरातील उष्णता कमी करण्यासाठीही हे खूप फायदेशीर आहे.
सर्वप्रथम, शांत ठिकाणी बसा.
तुम्हाला सुखासन किंवा पद्मासनात बसावे लागेल.
हे करण्यासाठी, तुमच्या उजव्या हाताचा अंगठा तुमच्या उजव्या नाकपुडीवर ठेवा.यानंतर, तुम्ही दुसऱ्या नाकपुडीतून म्हणजेच डाव्या नाकपुडीतून श्वास घ्यावा. आता श्वास घेताना डावी नाकपुडी बंद करा. आता उजव्या नाकपुडीवरून अंगठा काढा आणि श्वास बाहेर सोडा. यानंतर तुम्हाला फक्त उजव्या नाकपुडीतूनच श्वास घ्यायचा आहे. तुम्हाला डाव्या नाकपुडीतून श्वास बाहेर सोडावा लागेल. ही प्रक्रिया त्याच प्रकारे पुन्हा पुन्हा करा. हे प्राणायाम केल्याने तणाव कमी होतो, मनाला शांती मिळते आणि शरीरातील उष्णताही कमी होते.
यामुळे चिंतेपासून आराम मिळतो आणि चांगली झोप लागण्यासही मदत होते.
शीतली प्राणायाम
शीतली प्राणायामाचे अनेक फायदे आहेत.
यामुळे चांगली झोप लागते आणि तहान कमी होते. ज्यांना सतत खाण्याच्या सवयीचा त्रास होतो, त्यांनी हा प्राणायाम नक्कीच करावा, कारण तो अनावश्यक भूक कमी करतो. हा प्राणायाम रक्तदाब कमी करतो, आम्लपित्त आणि पोटातील अल्सरपासून आराम देतो, पचनक्रिया सुधारतो आणि हृदयविकारांना प्रतिबंध करतो. स्वच्छ जागेत चटई अंथरा आणि त्यावर बसा. सिद्धासन किंवा पद्मासनात बसणे उत्तम राहील तुमची जीभ बाहेर काढून तिला नळीसारखा आकार द्या. जिभेचा वापर करून हळूहळू श्वास आत घ्या, पोटात हवा भरा आणि मग तोंड बंद करा. तुमच्या जबड्याचा पुढचा भाग छातीला टेकवा.
क्षणभर श्वास रोखून धरा,
मग मान सरळ करून नाकावाटे श्वास बाहेर सोडा.



# सांसारिक कर्तव्य आणि अध्यात्मिक निष्ठेचा समतोल

**अभंगवाणी , विद्यावाचस्पती विद्यानंद**
**आइकाल परी ऐसें नव्हे बाई,**
**न सांडावी सोई भ्रताराची**
**नव्हे आराणूक लौकिकापासून,**
**आपल्या आपण गोविलें तें**
**तुका म्हणे मन कराल कठीण,**
**त्या या निवडोन मजपाशीं**

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने भारतीय अध्यात्माला एक वेगळी दिशा दिली. या परंपरेतील संतांनी भक्तीला केवळ मंदिर, तीर्थयात्रा किंवा धार्मिक कर्मकांडांपुरते मर्यादित ठेवले नाही; तर ती मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनविली. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाचा मार्ग खुला केला, संत नामदेवांनी प्रेमभक्तीची गोडी दिली, संत एकनाथांनी समतेची शिकवण दिली; तर संत तुकाराम महाराजांनी सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्ष, कर्तव्य, श्रद्धा आणि अध्यात्म यांचा अद्वितीय समन्वय घडवून आणला. त्यांच्या अभंगवाणीतून व्यक्त होणारे विचार हे केवळ भक्तिपर साहित्य नसून; ते मानवी जीवनाला दिशा देणारे कालातीत तत्त्वज्ञान आहे.
या अभंगात वापरलेली भाषा साधी असली तरी त्यामध्ये दडलेले तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आहे. संसारातील नातेसंबंध, सामाजिक जबाबदार्या, वैयक्तिक कर्तव्ये आणि अंतर्मनातील श्रद्धा यांचा योग्य समतोल साधणे हीच खरी साधना आहे, असे संत तुकाराम महाराज सुचवतात. त्यांनी संसार सोडून जंगलात जाण्याचा किंवा जीवनापासून पलायन करण्याचा मार्ग दाखवला नाही. उलट,त्यांनी संसारात राहूनही मनाने ईश्वराशी जोडलेले राहण्याचा मार्ग दाखवला. हा मार्ग सामान्य माणसासाठी अधिक उपयुक्त, अधिक व्यवहार्य आणि अधिक जीवनोन्मुख आहे.
आजच्या काळातही हा विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आधुनिक जीवनातील स्पर्धा, ताणतणाव, भौतिक अपेक्षा आणि नातेसंबंधातील गुंतागुंत यामुळे माणूस अनेकदा मानसिक अस्थिरतेचा अनुभव घेतो. काही जण अध्यात्माच्या नावाखाली जबाबदार्यांपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात; तर काही जण व्यवहाराच्या ओझ्याखाली अध्यात्म विसरून जातात. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचे हे अभंग संतुलित जीवनाचा मार्ग दाखवतात. कर्तव्य, विवेक, आत्मपरीक्षण आणि ईश्वरनिष्ठा यांचा संगम घडवून आणणारा हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.
संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीत भक्ती, वैराग्य, समाजजीवन आणि अध्यात्म यांचा विलक्षण समन्वय आढळून येतो. त्यांच्या अभंगांचा एक विशेष गुण म्हणजे ते जीवनाला दोन वेगळ्या भागांत विभागत नाहीत. एकीकडे संसार आणि दुसरीकडे अध्यात्म अशी कृत्रिम विभागणी त्यांनी कधीच मान्य केली नाही. उलट, त्यांनी सांगितले की, खरे अध्यात्म हे संसारापासून पळून जाण्यात नसून संसारात राहूनही ईश्वरनिष्ठ राहण्यात आहे. या अभंगाच्या ओळींमधून संत तुकाराम महाराजांनी अत्यंत सूक्ष्म आणि गहन जीवनतत्त्व मांडले आहे. या अभंगात त्यांनी भक्तीच्या नावाखाली कर्तव्याचा त्याग करण्याच्या प्रवृत्तीवर भाष्य केले असून; संसार आणि परमेश्वर यांच्यातील योग्य संतुलन कसे असावे याचे मार्गदर्शन केले आहे.
आइकाल परी ऐसें नव्हे बाई,न सांडावी सोई भ्रताराची या ओळीत संत तुकाराम महाराज एका स्त्रीला उद्देशून बोलत असल्याचे दिसते. परंतु हा संवाद केवळ एका स्त्रीपुरता मर्यादित नाही. तो प्रत्येक व्यक्तीसाठी आहे. येथे भ्रतार हा शब्द केवळ पती या अर्थाने नसून कर्तव्य, जबाबदारी आणि नातेसंबंध यांचे प्रतीक म्हणून वापरला गेला आहे. संत महाराज सांगतात की भक्ती करायची म्हणून आपल्या कर्तव्यांचा त्याग करणे योग्य नाही. संसारातील जबाबदार्या सोडून अध्यात्माच्या नावाखाली पलायन करणे हे खरे अध्यात्म नव्हे.संतपरंपरेत हा विचार अनेक संतांनी मांडला आहे. संत नामदेव महाराज विठ्ठलभक्त होते; पण त्यांनी आपला व्यवसाय आणि कुटुंब यांच्याकडे दुर्लक्ष केले नाही. संत सावता माळी शेतात काम करत असताना विठ्ठलाचे स्मरण करीत संत गोरा कुंभार मडकी घडवीत असतानाही परमेश्वराशी एकरूप झाले होते. कर्तव्याचे प्रामाणिक पालन हीच खरी भक्ती होती. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर ही ओळ कर्मयोगाचे तत्त्व स्पष्ट करते. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की कर्तव्य टाळणे हा उपाय नाही. निष्काम भावनेने कर्तव्य करणे हेच श्रेष्ठ आहे. संत तुकाराम महाराजांचा संदेश याच विचाराशी सुसंगत आहे. संसार सोडून जंगलात जाण्यापेक्षा संसारात राहूनही मनाने ईश्वराशी जोडलेले राहणे अधिक कठीण आणि अधिक श्रेष्ठ आहे.



नव्हे आराणूक लौकिकापासून, आपल्या आपण गोविलें तें या ओळीत संत तुकाराम महाराज मानवी मनाच्या अवस्थेचे विश्लेषण करतात. आराणूक म्हणजे पळून जाणे किंवा दूर जाणे. ते सांगतात की आपण संसारात अडकलो आहोत असे वाटते; पण प्रत्यक्षात आपल्याला कोणी बांधून ठेवलेले नसते. आपणच आपल्या इच्छा, अपेक्षा, मोह, लोभ आणि अहंकार यांच्या जाळ्यात स्वतःला अडकवून घेतलेले असते.
हा विचार अत्यंत गहन आहे. सामान्यतः माणूस आपल्या दुःखासाठी परिस्थितीला, समाजाला किंवा इतर व्यक्तींना जबाबदार धरतो. परंतु संत तुकाराम महाराज सांगतात की माणसाच्या बंधनांचे मूळ त्याच्या स्वतःच्या मनात असते. उदाहरणार्थ, दोन व्यक्ती एकाच परिस्थितीत राहतात. एक व्यक्ती समाधानी असते; तर दुसरी सतत अस्वस्थ असते. परिस्थिती समान असूनही अनुभव वेगळे का असतात? कारण बंधन बाह्य नसते; ते अंतर्मनात असते. आजच्या काळातही हा विचार तितकाच लागू पडतो. आधुनिक माणूस अनेकदा म्हणतो की कामाचा ताण आहे,समाजाच्या अपेक्षा आहेत, स्पर्धा आहे; त्यामुळे मनःशांती नाही. परंतु संतांचा प्रश्न वेगळा आहे. खरोखरच बाह्य परिस्थिती आपल्याला अस्वस्थ करते की आपल्या अपेक्षा आणि महत्त्वाकांक्षा आपल्याला बांधून ठेवतात?अनेकदा आपणच आपल्या इच्छांचे कैदी बनतो. अधिक पैसा,अधिक प्रतिष्ठा,अधिक मान्यता मिळवण्याच्या धडपडीत आपण स्वतःचे स्वातंत्र्य गमावून बसतो.सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले तर हा अभंग जबाबदारीची जाणीव करून देतो. समाजातील अनेक समस्या या इतरांवर दोषारोप करण्याच्या वृत्तीमुळे वाढतात. प्रत्येकाने आत्मपरीक्षण केले आणि स्वतःच्या चुका स्वीकारल्या; तर समाज अधिक सुदृढ होईल.
तुका म्हणे मन कराल कठीण, त्या या निवडोन मजपाशीं या शेवटच्या ओळीत संत तुकाराम महाराज साधकाला एक महत्त्वपूर्ण सूचना देतात. मन कठीण करणे म्हणजे संवेदनाशून्य होणे नव्हे. येथे कठीण म्हणजे दृढ, स्थिर आणि निश्चयी होणे. जोपर्यंत मन अस्थिर आहे; तोपर्यंत योग्य आणि अयोग्य, शाश्वत आणि अशाश्वत, सत्य आणि असत्य यातील फरक समजत नाही. निवडोन या शब्दात विवेकाचे तत्त्व दडलेले आहे. जीवनात अनेक गोष्टी आकर्षक वाटतात;पण सर्वच गोष्टी हितकारक नसतात. जसे सुवर्ण आणि पितळ दिसायला सारखे वाटू शकतात; पण त्यांची किंमत वेगळी असते. तसेच जीवनातही विवेकाने निवड करावी लागते. संत तुकाराम महाराज सांगतात की ज्याचे मन दृढ आहे, जो विवेकाने निर्णय घेतो; तोच खर्या अर्थाने ईश्वराच्या जवळ पोहोचतो. आध्यात्मिक दृष्टिकोनातून प्रत्येक ओळ साधनेचा मूलमंत्र आहे.
ध्यान, नामस्मरण, प्रार्थना किंवा सेवा यांपैकी कोणतीही साधना करायची असेल; तर मनाची स्थिरता आवश्यक आहे. चंचल मन सतत बाहेर धावत राहते. परंतु दृढ मन अंतर्मुख होते आणि आत्मचिंतनाच्या मार्गावर चालते. म्हणूनच संतांनी मनाला जिंकण्यावर भर दिला आहे. या अभंगातून संत तुकाराम महाराज एक अत्यंत संतुलित जीवनदर्शन मांडतात. ते ना अति संसारवाद स्वीकारतात, ना अति वैराग्य. ते सांगतात की संसारात राहा; पण संसारात गुरफटून जाऊ नका. नाती जपा; पण त्यांच्यात आसक्ती निर्माण होऊ देऊ नका. कर्तव्य करा; पण अहंकार बाळगू नका. भक्ती करा; पण जबाबदार्या टाळू नका. आजच्या काळात हा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. आधुनिक जीवनात अनेक लोक अध्यात्म आणि व्यवहार यांना परस्परविरोधी मानतात. काही जण अध्यात्माच्या नावाखाली जबाबदार्या टाळतात; तर काही जण व्यवहाराच्या धावपळीत अध्यात्म विसरून जातात.
या अभंगाचा मूळ संदेश असा आहे की जीवनातील खरी मुक्ती संसार सोडण्यात नाही; तर मनातील आसक्ती सोडण्यात आहे. खरी भक्ती कर्तव्य टाळण्यात नाही; तर कर्तव्याला ईश्वरसेवा मानण्यात आहे आणि खरे वैराग्य जगापासून दूर जाण्यात नाही; तर जगात राहूनही अंतर्मनाने परमेश्वराशी जोडलेले राहण्यात आहे. संत तुकाराम महाराजांच्या या अभंगाचा सखोल विचार केला असता असे जाणवते की त्यांनी मानवी जीवनातील सर्वांत मोठ्या द्वंद्वाला स्पर्श केला आहे. संसार आणि अध्यात्म, कर्तव्य आणि वैराग्य, व्यवहार आणि भक्ती या परस्परविरोधी वाटणार्या संकल्पनांचा त्यांनी अत्यंत समतोल आणि व्यावहारिक पद्धतीने उलगडा केला आहे. त्यांच्या मते जीवनातील खरी साधना ही संसाराचा त्याग करण्यात नसून संसारातील जबाबदार्यांचे प्रामाणिक पालन करताना अंतर्मनाने परमेश्वराशी जोडलेले राहण्यात आहे.
आजच्या आधुनिक युगात संत तुकाराम महाराजांचा हा संदेश अधिकच उपयुक्त वाटतो. भौतिक प्रगतीच्या शर्यतीत माणूस अनेकदा स्वतःलाच विसरून जातो. यश, पैसा, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा यांचा पाठलाग करताना अंतर्मनातील शांतता हरवते. अशा वेळी संतांचा संदेश आपल्याला स्मरण करून देतो की जीवनाचा खरा अर्थ बाह्य उपलब्ध्यांमध्ये नसून अंतःकरणातील समाधानात आहे. संसारात राहूनही त्याचा गुलाम न होता, कर्तव्य करताना अहंकार न बाळगता आणि भक्ती करताना पलायनवाद न स्वीकारता जगणे; हीच खरी साधना आहे.संत तुकाराम महाराजांचा हा अभंग मानवी जीवनासाठी एक दीपस्तंभ आहे. तो आपल्याला शिकवतो की संसार आणि अध्यात्म यांमध्ये भिंत उभी करण्याची गरज नाही. उलट, या दोन्हींचा समतोल साधला तरच जीवन परिपूर्ण होते. कर्तव्यनिष्ठ व्यवहार, विवेकपूर्ण विचार, अंतर्मुख आत्मपरीक्षण आणि अखंड ईश्वरस्मरण यांमधूनच जीवनाला खरे सौंदर्य प्राप्त होते. संत तुकाराम महाराजांचा हा संदेश काळाच्या पलीकडे जाऊन आजही प्रत्येकाला आत्मजागृती, संतुलन आणि आध्यात्मिक समृद्धीचा मार्ग दाखवत राहतो.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



आहारात कॅल्शियम आणि लोह यांचं प्रमाण भरपूर असेल, अशा पदार्थांचा समावेश करावा. यात मेथी, पालक, हिरव्या पालेभाज्या यांचा समावेश आहे. कोबी या भाजीत अँटिऑक्सिडन्ट असतात. व्हिटॅमिन आणि फॉलेट-फायबरही असतं. सॅलडच्या स्वरुपात भाज्यांचा आहारात समावेश करा. कॅल्शियम हाडांमधील महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या कमतरतेमुळे हाडं कमजोर होतात. ङ्गन्यूरो सिस्टमम चांगलं ठेवण्यासाठी कॅल्शियम महत्त्वाची भूमिका बजावते. कॅल्शियमचं प्रमाण कमी झाल्यास शरीरात उपलब्ध असलेलं कॅल्शियम अधिक प्रमाणात वापरलं जातं. त्यामुळे हाडांमधील कॅल्शियम कमी होण्यास सुरुवात होते.

## २ Joke विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game kheltehо?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought सुविचार



जगातील सर्व प्रतिभासंपन्न माणसे ईश्वराच्या समीप असतात.
- स्टीव्हनसन

**संस्कृत सुभाषित**
**स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।**
**सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम्।।**

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**
१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**
१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**
१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**
१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर




## थोडक्यात/ संक्षिप्त

### इंग्लंडला पाठिंबा देण्यासाठी खेळाडूने चाहत्यांना वाटले स्टिकर्स

मुंबई-प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते की त्याला त्याच्या देशासाठी खेळावे हे त्याचे आयुष्यामध्ये लक्ष असते. पण अनेकदा देशांसाठी खेळणे आणि मग आंतरराष्ट्रीय स्तरावर देशातील संघामध्ये स्थान टिकवून ठेवणे हे आपल्या हातात नसते. सध्या फुटबॉल वर्ल्डकप सुरु आहे आणि त्यामुळे जगभरामध्ये या स्पर्धेची चर्चा सोशल मिडियावर फ ुटबॉल चाहत्यांमध्ये सुरु आहे. आता सध्या एक इंग्लंडच्या फुटबॉल खेळाडूचा एक व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहे. फिफा विश्वचषक २०२६ साठी हॅरी मॅग्वायरला इंग्लंडच्या संघात स्थान देण्यात आले नाही. त्यामागचं कारण काय आहे याबद्दल न विचार करता त्याने त्याच्या पद्धतीने संघाला पाठिंबा देण्याचा विचार केला आहे. इंग्लंडचा खेळाडू हॅरी मॅग्वायर याला संघात स्थान मिळाले नाही पण आता त्याने त्याच्या संघाला पाठिंबा देण्यासाठी स्टिकर अल्बम वितरित करताना दिसला. संघात खेळता आले नाही म्हणून त्याने त्याच्या संघाला पाठिंबा देण्याचे ठरवले, न्यूयॉर्क शहरात, हॅरी मॅग्वायर चाहत्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित होता यावेळी तो रॉकफेलर सेंटरमध्ये पाणिनी स्टिकर्स वितरीत करताना दिसला. त्यानंतर तो टाइम्स स्क्वेअर जवळील युनायटेड-थीम असलेल्या फॅन-बारमध्ये चाहत्यांना भेटण्यासाठी पोहोचला होता.

### रोहित शर्माला मिळणार नवा पार्टनर?

मुंबई-आयपीएल २०२७ च्या मेगा ऑक्शन आणि आगामी हंगामापूर्वी क्रिकेट जगतात मोठ्या घडाम ोडींना वेग आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करणाऱ्या हार्दिक पांड्याचं भविष्य आता धोक्यात असल्याचं दिसत आहे. हार्दिकच्या नेतृत्वात मुंबईला अपेक्षित यश मिळालेले नाही, उलट तीनपैकी दोन हंगामात संघाची कामगिरी अत्यंत सुमार झाली. सूत्रांच्या माहितीनुसार, हार्दिक स्वत: इतर संघांमध्ये संधी शोधत असून, राजस्थान रॉयल्सचा धडाकेबाज सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि हार्दिक यांच्यात ट्रेड होण्याची दाट शक्यता आहे.मरेवस्पोर्ट्जफच्या अहवालानुसार, मुंबई इंडियन्स रोहित शर्माचा योग्य पर्याय म्हणून यशस्वी जैस्वालकडे पाहत आहे. यशस्वी हा मुंबईचाच खेळाडू असल्याने वानखेडे स्टेडियम त्याचा घरचा मैदान आहे. जर हार्दिक राजस्थानमध्ये गेला, तर यशस्वी मुंबईच्या गोटात सामील होऊ शकतो. धक्कादायक बाब म्हणजे, मुंबई इंडियन्स एका नव्या आणि तरुण संघाची बांधणी करत असल्याने, ते आगामी काळात सूर्यकुमार यादवलाही संघातून रिलीज करू शकतात.मुंबई इंडियन्स पुढील आठवड्यात एक महत्त्वाची बैठक घेणार आहे

### लक्ष्य सेन आणि तन्वी शर्माकडे भारतीय संघाचे नेतृत्व

वॉशिंग्टन-यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत अनुभवी लक्ष्य सेन आणि उदयोन्मुख खेळाडू तन्वी शर्मा भारताचे नेतृत्व करतील. पुरुष गटात किदाम्बी श्रीकांतसह इतर अनेक भारतीय बॅडमिंटनपटू एकेरी स्पर्धेत आपले नशीब आजमावतील. महिला एकेरी स्पर्धेत एकूण सात भारतीय बॅडमिंटनपटू सहभागी होतील.लक्ष्य सेनला या स्पर्धेत दुसरे मानांकन असून पहिल्या फेरीत त्याचा सामना बेल्जियमच्या ज्युलियन कॅरेगीशी होईल. या महिन्याच्या सुरुव-तीला इंडोनेशिया ओपनमध्ये पहिल्याच फेरीत बाहेर पडल्यानंतर, लक्ष्य पुनरागमन करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. श्रीकांत पुरुष एकेरीतील आपला पहिला सामना चायनीज तैपेईच्या लियाओ झुओ-फू विरुद्ध खेळेल.

आणखी एक भारतीय बॅडमिंटनपटू सनिथ दयानंद, जपानच्या चौथ्या मानांकित युदाई ओकिमोतो विरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. एस. शंकर मुथुसामी सुब्रमण्यन यांनीही मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले असून त्यांचा सामना एका पात्रताफेरीतून आलेल्या बॅडमिंटनपटूशी होईल. महिला एकेरीमध्ये, पाचवी मानांकित तन्वी शर्मा आणि सहावी मानांकित देविका सिहाग सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या प्रयत्नात असतील.

### महिला संघाने आशियाई रिले चॅम्पियनशिप स्पर्धेत सुवर्णपदक

दिल्ली-एशियन रिले चॅम्पियनशिप्स २०२६ मध्ये भारतीय महिला संघाने सुवर्णपदकाला गवसणी घा-तली. ४एक्स१०० मीटर स्पर्धेत भारताच्या महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. अंतिम फेरीत भारतीय संघाने चीनचा पराभव केला आणि ४३.८५ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवली. या स्पर्धेत भारताने एकूण तीन पदकं एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य जिंकली.

या संघात श्राबनी नंदा, एस.एस. स्नेहा, सुदेशना शिवंकर आणि तमन्ना यांचा समावेश होता. या चौघींनी शर्यतीदरम्यान अचूक बॅटनची देवाण-घेवाण आणि उत्कृष्ट अंतिम गती दाखवली. भारताने ४३.८५ सेकंदांची वेळ नोंदवत प्रथम क्रमांक पटकावला. या शर्यतीत चीनच्या संघाने ४४.०९ सेकंदांची वेळ घेत रौप्यपदक जिंकले आणि दुसरे स्थान मिळवले, तर थायलंडने ४४.११ सेकंदांच्या वेळेसह कांस्यपदक जिंकले. रिलायन्स फाउंडेशनचे प्रशिक्षक मार्टिन ओवेन्स यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने शर्यतीचं नियोजन यशस्-वीपणे अंमलात आणले. या स्पर्धेत तमन्ना आणि स्नेहा शानुवल्ली यांनी भारतासाठी उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरी करत प्रत्येकी दोन

# महिला क्रिकेटपटूंसाठी आयसीसीने घेतला मोठा निर्णय

नवी दिल्ली : खेळपट्ट्यांवर चौकार-षटकार मारण-ारी एखादी खेळाडू जेव्हा आई होण्याचा निर्णय घेते, तेव्हा बऱ्याचदा तिला तिच्या कारकिर्दीला पूर्णविराम द्यावा लागतो. खेळ आणि मातृत्व या दोन वेगवेगळ्या वाटांवरून चालताना होणारी तिची ओढाताण आता थांबणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने महिला क्रिकेटपटूंसाठी 'प्रसूतीनंतर पुनरागमन' ही अत्यंत संवेदनशील आणि व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. आई झाल्यानंतरही महिला खेळाडू सन्मानाने आणि सुरक्षितपणे पुन्हा मैदानावर परतू शकतील, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. आज महिला क्रिकेट मोठ्या उंचीवर पोहोचले आहे. खेळात करिअर घडवत असतानाच, अनेक खेळाडू आई बनून कुटुंब सुरू करण्याचा आनंदही घेऊ इच्छितात. पण बाळाच्या जन्मानंतर पुन्हा आधीसारखंच तंदुरुस्त होऊन मैदानात उतरणं शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सोपं नसतं. खेळाडूंची हीच अडचण ओळखून आयसीसीने त्यांच्या आरोग्याची आणि कल्याणाची संपूर्ण जबाबदारी घेणारे हे पाऊल उचलले आहे.




महिला खेळाडूला आई होण्याच्या प्रवासापासून ते पुन्हा मैदानात पहिली धाव घेईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर साथ देण्यासाठी '६ आर' चा एक विशेष आराखडा तयार करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलिया संघाच्या डॉक्टर फिलिपा इंगे यांच्या नेतृत्वाखाली ही नियमावली तयार झाली आहे. यात केवळ खेळाचाच विचार नाही, तर एका आईच्या व्यावहारिक गरजाही जपल्या आहेत. सरावाच्या वेळात लवचिकता असणे, स्टेडियमवर बाळाला दूध पाजण्यासाठी किंवा त्याची काळजी घेण्यासाठी हक्काची आणि सुरक्षित जागा असणे, आणि प्रवासातही बाळाला सोबत ठेवण्यासाठी मदत करणे, अशा अनेक कौतुकास्पद बाबींचा यात समावेश आहे.

'६ आर' चा आधार १. रेडी : प्रसूतीनंतर आईच्या शरी-राला मिळणारा विश्रांतीचा पहिला टप्पा. २. रिव्ह्यू : तिची शारीरिक आणि मानसिक प्रकृती नेमकी कशी आहे, याची वैद्यकीय तपासणी. ३. रिस्टोर : गमावलेली शारीरिक क्षमता आणि ऊर्जा हळूहळू परत मिळवणे. ४. रिकंडिशन : घाई न करता, शरीराला झेपेल अशा संथ गतीने सराव सुरू करणे. ५. रिटर्न : पुन्हा बॅट-बॉल हाती घेऊन क्रिकेटच्या मुख्य प्रवाहात येणे. ६. रिफाईन : ती संघात परतल्यानंतरही तिच्या आरोग्याची आणि तिच्या बाळाची सतत काळजी घेणे.

मातृत्व आणि देशाचे प्रतिनिधित्व; आता दोन्हींची निवड करता येईल २०२१ मध्ये मुलाला जन्म देऊन आता २०२६ च्या विश्वचषकात वेस्ट इंडीजकडून खेळणारी अफी फ्लेचर आपली भावना व्यक्त करताना म्हणाली, प्रसूतीनंतर शारीरिक सुदृढता मिळवणे कठीण होतेच, पण त्याहूनही कठीण होते आपल्या लहान बाळाला घरी सोडून मैदानात जाणे. आयसीसीच्या या धोरणामुळे आता कोणत्याही महिला खेळाडूला तिचे कुटुंब आणि स्वप्न यापैकी एकाचीच निवड करावी लागणार नाही. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनीही या निर्णयाचे मनापासून स्वागत केले. ते म्हणाले, कोणत्याही महिला खेळाडूवर आई होण्यासाठी देश सोडून देण्याची वेळ येऊ नये. हा निर्णय केवळ नियमांचा नाही, तर आमच्या खेळाडूंच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर त्यांची काळजी घेण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. महिला खेळाडूंनी मैदानावर आणि मैदानाबाहेरही आनंदाने जगावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# मोहम्मद सालाहच्या जादूई कामगिरीने इजिप्त देशाचा ऐतिहासिक विजय

मियामी (फ्लोरिडा) : फिफा विश्वचषक २०२६ मध्ये एका छोट्या देशाने फुटबॉल जगताला थक्क केले आहे. केवळ ५ लाख लोकसंख्या असलेला 'केप व्हर्डे' हा देश आता फुटबॉल ...

सामन्याची सुरुवात न्यूझीलंडसाठी आश्वासक ठरली. १५ व्या मिनिटाला फिन सरमनने हेडरद्वारे गोल करत न्यूझीलंडला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या हाफमध्ये इजिप्तने बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही.

मध्यंतरानंतर मात्र इजिप्तच्या संघाने पूर्णपणे वेगळ्या आवेशात मैदानात उतरण्याचे ठरवले होते. ५८ व्या मिनिटाला मोस्तफा झिकोने शानदार हेडर मारत संघाला १-१ अशी बरोबरी मिळवून दिली. त्यानंतर मोहम्मद सालाहने झिकोच्या बॅक-हील पासवर गोल करत संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या ८२ व्या मिनिटाला ट्रेझेगेटच्या डायव्हिंग हेडरने इजिप्तच्या विजयावर ३-१ अशी मोहोर उमटवली.

'फॅरोज'चे प्रशिक्षक आणि खेळाडूंचा उत्साह सामन्यानंतर इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांनी खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक केले. ते म्हणाले, आम्ही ठरवले होते की जोपर्यंत विजय मिळवत नाही, तोपर्यंत मैदान सोडायचे नाही. खेळाडूंनी आज दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे. मोहम्मद सालाहने हा विजय आपल्या संघासाठी अत्यंत खास असल्याचे सांगितले. या गोलमुळे सालाह आता राष्ट्रीय संघाच्या सर्वकालीन सर्वाधिक गोल करण्याच्या विक्रमाच्या अगदी जवळ पोहोचला आहे.

१८ वर्षीय यामालचा विश्वचषकात विक्रम; स्पेनचा मोठा विजय!



बलाढ्य न्यूझीलंडचा ३-१ ने पराभव

**व्हँकूवर, ब्रिटिश कोलंबिया : फिफा विश्वचषक २०२६ मध्ये इजिप्तच्या संघाने नवा इतिहास रचला आहे. रविवारी रात्री बीसी प्लेस स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात, स्टार खेळाडू मोहम्मद सालाहच्या निर्णायक गोलच्या जोरावर इजिप्तने न्यूझीलंडचा ३-१ असा पराभव करत स्पर्धेतील आपला पहिला-वहिला विजय नोंदवला. या विजयामुळे इजिप्तच्या चाहत्यांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे.मलहानफकेप व्हर्डेचा ममोठाफचमत्कार! बलाढ्य उरुग्वेला २-२ ने रोखून रचला इतिहास**

स्पेनने (डरिळप) सौदी अरेबियाचा (डर्रीवळ -ीरलळर) ४-० असा धुव्वा उडवत गट 'एच' (त्र्रीिक) मधील पहिला विजय नोंदवला. अटलांटा (-ींश्ररपींर) येथे झालेल्या या सामन्यात १८ वर्षीय लामिन यामाल गुणतालिकेतील स्थिती आणि पुढील आव्हान या विजयामुळे इजिप्तचा संघ 'ग्रुप जी' मध्ये गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. मात्र, बाद फेरीतील स्थान अजूनही निश्चित झालेले नाही. शुक्रवारी सिएटलमध्ये इराणविरुद्ध होणारा सामना इजिप्तसाठी 'करो या मरो' स्वरूपाचा असेल. पुढील फेरीत प्रवेश करण्यासाठी इजिप्तला हा सामना अनिर्णित राखणे आवश्यक आहे.

दुसरीकडे, न्यूझीलंड संघ अजूनही आपल्या पहिल्या विश्वचषक विजयाच्या शोधात आहे. अनुभवी खेळाडू ख्रिस वूडने निराशा व्यक्त केली असली तरी, बेल्जियमविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात विजय मिळवून स्पर्धेत टिकून राहण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. स्पर्धेतील इतर सामन्यांचा विचार करता, इराण आणि बेल्जियम यांच्यातील सामना गोलशून्य बरोबरीत सुटल्याने 'ग्रुप जी' मध्ये आता चुरस निर्माण झाली आहे.




# खेळाडूची पँट फाटली आणि रेफरीने लगेच बाहेर पाठवले!

दिल्ली-फुटबॉल विश्वचषक २०२६ चा इजिप्त विरुद्ध न्यूझीलंड यांच्याम ध्ये पार पडला, या सामन्यात एक विचित्र घटना घडली. इजिप्त विरुद्ध न्यूझीलंड या सामन्यामध्ये न्यूझीलंडच्या संघाने १५ व्या मिनिटालाच आघाडी घेतली होती. या सामन्यामध्ये इजिप्तचा मोहम्मद सलाहच्या दमदार कामगिरीमुळे संघाला न्यूझीलंडविरुद्ध ३-१ असा सामन्यात विजय मिळवण्यात यश मिळाले. विश्वचषकाच्या इतिसाहात इजिप्तचा हा पहिला विजय आहे. सुरुवातीलाच आघाडी घेतल्यानंतर, किवी संघ इजिप्तच्या आक्रम क खेळाचा सामना करू शकला नाही. त्यामुळे न्यूझीलंडला या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. इजिप्त विरुद्ध न्यूझीलंड या सामन्यामध्ये एक विचित्र प्रकार पाहायला मिळाला, ते म्हणजेच सामन्यादरम्यान सला-हची शॉर्ट्स फाटल्यामुळे संघाला एका खेळाडूशिवाय खेळावे लागले. चालू सामन्यातील घटनेबद्दल सविस्तर सांगायचे झाले तर पहिला गोल इजिप्तचा झाल्यानंतर खेळाडूंचा उत्साह वाढला आणि गोल टाळण्यासाठी संघाने बदली खेळाडूंना मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी मैदानात असलेला कॅलम मॅकोवॅटच्या जागी आक्रमणासाठी बेन ओल्डला बोलावले. बेन ओल्ड हा मैदानावर काही वेळ होता त्यानंतर अचानक त्याची चालू सामन्यात शॉर्ट्स फाटली आणि त्याला मैदानातून बाहेर काढण्यात आले. विश्वचषकाचं तिकीट हुकलं, पण देशासाठीचं प्रेम नाही! इंग्लंडला पाठिंबा देण्यासाठी खेळाडूने चाहत्यांना वाटले स्टिकर्स-बेन ओल्डच्या शॉट्सवर संवेदनशील ठिकाणी मोठे छिद्र पडल्यामुळे न्यूझीलंडचा एक खेळाडू कमी झाला. या घटनेचे अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. या घटनेचा फायदा घेत इजिप्तचा प्रमुख खेळाडू मोहम्मद सलाह बॉक्समध्ये वेगाने घुसला आणि खालच्या डाव्या कोपऱ्यात एक जोरदार शॉट मारून आपल्या संघाला सामन्यात निर्णायक आघाडी मि ळवून दिली. सालाहच्या त्या किकमुळे न्यूझीलंडच्या खेळाडूंचा श्वास फुलला होता. इजिप्त विरुद्ध न्यूझीलंड सामन्यात दुसऱ्या हाफमध्ये साम न्याची चित्रच बदलले, या सामन्यामध्ये ५८ व्या मिनिटाला मुस्तफा झिकोने इजिप्तचा पहिला गोल करून बरोबरी साधली. मोहम्मद सलाहने या सामन्याच कमालीची कामगिरी केली.

# चॅम्पियन टीम इंडियावर एका पराभवामुळे टी२० वर्ल्ड कप २०२६ मधून बाहेर होण्याचा धोका, जाणून घ्या समीकरण

मुंबई-सध्या इंग्लंडमध्ये महिला टी२० वर्ल्ड कप २०२६ चे सामने सुरु आहेत. १ जून पासून या वर्ल्ड कपला सुरुवात झाली असून यात एकूण १२ संघांनी सहभाग घेतलाय. सुरुवातीला या स्पर्धेचे ग्रुप स्टेज सामने सुरु असून १२ संघांना प्रत्येकी ६-६ अशा दोन ग्रुपमध्ये विभागण्यात आलं आहे. यातील भारतीय संघाचा समावेश हा ग्रुप ए मध्ये करण्यात आला असून यात भारताशिवाय ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेदरलँड अशा संघांचा समावेश आहे. भारताने आतापर्यंत स्पर्धेत एकूण तीन सामने खेळलेत. यापैकी पाकिस्तान आणि नेदरलँड विरुद्ध सामना टीम इंडियाने जिंकला तर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या सामन्यात मात्र त्यांचा पराभव झाला. तीन पैकी दोन ग्रुप स्टेज सामने भारताने जिंकले असले तरी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एक सामना गमावल्यामुळे त्यांचं सेमी फायनलमधील स्थान अडचणीत येऊ शकतं. हा एक पराभव सुद्धा महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ चा चॅम्पियन संघ ठरलेल्या टीम इंडियासाठी टी२० वर्ल्ड कप २०२६ मधून बाहेर पडण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो. तेव्हा सेमी फायनलमध्ये पोहोचण्यासाठी भारताच्या महिला संघाचं समीकरण कसं आहे याविषयी जाणून घेऊयात.

पॉईंट्स टेबलमध्ये कोणता संघ कोणत्या स्थानी? यंदाच्या महिला टी२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये १२ संघांचा समावेश आहे. यातील प्रत्येकी ६-६ संघांना ग्रुप ए आणि ग्रुप बी मध्ये विभागण्यात आलं आहे. टीम इंडियाला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध



२१ जून रोजी खेळवण्यात आलेल्या सामन्यात ६ विकेटने पराभव मिळाला, ज्यामुळे पॉईंट्स टेबलमधील समीकरण हे पूर्णपणे बदललं आहे. ग्रुप ए मधील ऑस्ट्रेलिया संघाने ग्रुप स्टेजमधील सुरुवातीचे तीनही सामने जिंकून नंबर १ च्या स्थानी पोहोचले आहेत. तर भारताने तीन पैकी दोन सामने जिंकून दुसरं स्थान मिळवलं आहे. दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश यांच्यात सामान पॉईंट्स आहेत, मात्र चांगल्या नेट रन रेटमुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ तिसऱ्या स्थानी आहे. तर पाकिस्तान आणि नेदरलँड संघ लागोपाठ तीन सामन्यात पराभूत झाल्याने स्पर्धेतून बाहेर झालेत.

टीम इंडियाची चिंता का वाढली? भारतीय संघाच्या अडचणी यामुळे वाढल्या आहेत कारण आता त्यांचे सामने हे बांगलादेश आणि ऑस्ट्रेलिया या संघांविरुद्ध आहेत. आयसीसीच्या नियमांनुसार प्रत्येक ग्रुपमधील दोन संघ नॉकआउट सामन्यात पोहोचतील. जर टीम इंडियाला भारतीय संघाविरुद्ध पराभव मिळाला तर ते ६ पॉईंट्स वरच राहतील आणि सेमीफायनलमध्ये जाण्याचा त्यांचा मार्ग अडचणींचा होईल. दुसरीकडे दक्षिण आफ्रिका संघाचे उर्वरित सामने हे बांगलादेश आणि नेदरलँड विरुद्ध आहेत. या दोन्ही संघांपेक्षा दक्षिण आफ्रिकेचा संघ हा वरचढ ठरू शकतो. दक्षिण आफ्रिकेने उर्वरित दोन्ही सामने जिंकले तर त्यांचे ८ पॉईंट्स होतील आणि ते सेमी फायनमध्ये स्थान मिळतील.

मात्र अजूनही सेमी फायनलचं समीकरण हे पूर्णपणे भारताच्या विरुद्ध नाहीये. जर ऑस्ट्रेलिया आपल्या पुढील सामन्यात पाकिस्तान आणि भारत या दोघांविरुद्ध पराभूत झाली तर चित्र पूर्णपणे पालटू शकतं आणि अनेक संघ क्वालिफिकेशनच्या शर्यतीत येऊ शकतात. सेमी फायनलमध्ये स्थान मिळवायचं असेल तर भारताला काहीही करून बांगलादेश आणि ऑस्ट्रेलिया यांच्या विरुद्ध उर्वरित ग्रुप स्टेज सामने जिंकावे लागतील. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामन्यात काय घडलं? भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना १५९ धावांचं टार्गेट ठेवलं. त्याच्या उत्तरात दक्षिण आफ्रिकेच्या मारिजाने कैपने ८१ धावांची जबरदस्त खेळी खेळली आणि ज्यामुळे त्यांनी विजयासाठीचं टार्गेट १९.१ ओव्हरमध्ये पूर्ण केलं. दक्षिण आफ्रिकेने ६ विकेटने विजय मिळवला. या सामन्यात राधा यादव कडून दोन सुटलेले कॅच सुद्धा टीम इंडियावर भारी पडले. तिने मारिजाने कैपला एकदा २७ धावांवर असताना आणि एकदा ६६ धावांवर असताना जीवदान दिलं. ज्याचा पूर्ण फायदा मारिजाने कैपने उचलला.

# मुंबई-लातूर व मुंबई-बिदर एक्सप्रेसला २४ डब्यांची वाढ; प्रवाशांना मिळणार १८२ अतिरिक्त जागा



**सोलापूर/प्रतिनिधी:** प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) मुंबई-लातूर आणि सीएसएमटी मुंबई-बिदर एक्सप्रेस गाड्यांना अतिरिक्त तीन डबे जोडण्याचा निर्णय घेतला आहे. या वाढीमुळे गाड्यांची रचना २१ डब्यांवरून २४ डब्यांची होणार असून प्रवाशांसाठी १८२ अतिरिक्त जागांची उपलब्धता निर्माण होणार आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक २२१०७ सीएसएमटी मुंबई-लातूर एक्सप्रेसमध्ये २५ जून २०२६ पासून, तर २२१०८ लातूर-सीएसएमटी मुंबई एक्सप्रेसमध्ये २६ जून २०२६ पासून अतिरिक्त डबे जोडण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे, २२१४३ सीएसएमटी मुंबई-बिदर एक्सप्रेसमध्ये २६ जूनपासून आणि २२१४४ बिदर-सीएसएमटी मुंबई एक्सप्रेसमध्ये २७ जूनपासून ही सुविधा लागू होईल.

सुधारित रचनेनुसार गाडीत एक प्रथम वातानुकूलित (फर्स्ट एसी), तीन एसी-द्वितीय श्रेणी, पाच एसी-तृतीय श्रेणी, नऊ शयनयान (स्लीपर), चार सामान्य द्वितीय श्रेणी तसेच दोन गार्ड-कम-ब्रेक व्हॅन असे एकूण २४ आयसीएफ डबे असतील.

अतिरिक्त डब्यांमध्ये एक एसी-द्वितीय श्रेणी (४६ जागा), एक एसी-तृतीय श्रेणी (६४ जागा) आणि एक स्लीपर कोच (७२ जागा) यांचा समावेश असून एकूण १८२ अतिरिक्त जागांची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या निर्णयामुळे मुंबई, लातूर आणि बिदर दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. सोलापूर विभागाने प्रवाशांना नव्याने वाढविण्यात आलेल्या डब्यांच्या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# औसा तालुक्यातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा कामांसाठी ९ कोटींचा निधी मंजूर

## आमदार अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा

**औसा/प्रतिनिधी:** औसा मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, राज्य शासनाने विधानसभेत सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये औसा तालुक्यातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा कामांसाठी एकूण ९ कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या निधीमुळे अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असलेल्या रस्त्यांचे नूतनीकरण होणार असून परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मंजूर झालेल्या कामांमध्ये एकंबी ते उजनी रस्त्याच्या सुधारणेसाठी ६ कोटी तर कारला-कुमठा ते निलंगा रस्त्याच्या सुधारणेसाठी ३ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. या दोन्ही रस्त्यांची अवस्था गेल्या काही वर्षांत अत्यंत खराब झाली होती. रस्त्यांवरील खड्डे, तुटलेले डांबरीकरण आणि अपुऱ्या दुरुस्तीमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात या मार्गांवरून प्रवास करणे धोकादायक बनत होते. आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्य शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून या रस्त्यांच्या दुरुस्ती व सुधारणा कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर या कामांचा समावेश पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आला असून निधीस मंजुरी मिळाली आहे.

एकंबी, उजनी, कारला, कुमठा, तसेच परिसरातील अनेक गावांतील नागरिक या रस्त्यांचा दैनंदिन वापर करतात. शेतकरी आपल्या शेतमालाच्या वाहतुकीसाठी, विद्यार्थी शिक्षणासाठी तसेच व्यापारी आणि नागरिक विविध कामांसाठी या मार्गांचा वापर करतात. रस्त्यांची सुधारणा झाल्यानंतर वाहतुकीचा वेग वाढणार असून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम होऊन आर्थिक आणि सामाजिक विकासालाही चालना मिळणार आहे.या कामांमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. कृषी उत्पादनांच्या वाहतुकीवरील खर्च कमी होईल तसेच विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक केंद्रांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचता येईल. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, व्यापारी व्यवहार आणि शासकीय कामकाजासाठीही या रस्त्यांचा मोठा फायदा होणार आहे. निधीस मंजुरी मिळाल्यानंतर स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून अनेक ग्रामस्थांनी आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याचे कौतुक केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनित्रा पवार तसेच सार्वजनिक बांधकाम



मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयाबद्दल नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# ५ जूनला पर्यावरणाची आठवण, पण उर्वरित ३६४ दिवस दुर्लक्ष; वाढत्या संकटांवर थेट सवाल

**धाराशिव/शेख अंजुम**

दरवर्षी ५ जून रोजी पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. लाखो झाडे लावली जातात, विविध कार्यक्रम घेतले जातात, पर्यावरण संवर्धनाचे संदेश दिले जातात. मात्र हा उत्साह केवळ एका दिवसापुरता मर्यादित राहतो की काय, असा सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कारण पर्यावरणासमोरील संकटे दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालली आहेत.

वाढते तापमान : गेल्या काही वर्षांत उन्हाळ्याची तीव्रता लक्षणीय वाढली आहे. एप्रिल-मे महिन्यातच तापमान विक्रमी पातळीवर पोहोचत आहे. झाडांची घटती संख्या आणि वाढते काँक्रीटीकरण यामुळे उष्णतेचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे.

**अनियमित पाऊस आणि दुष्काळ :** कधी अतिवृष्टी तर कधी दीर्घकाळ पावसाचा खंड, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असून शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत.

**भूजल पातळीतील घट :** बोअरवेल आणि विहिरींची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत आहे. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनत चालली आहे. पावसाचे पाणी साठवण्याबाबत अजूनही पुरेशी जनजागृती झालेली दिसत नाही.

प्रदूषणाची वाढ : हवा, पाणी आणि ध्वनी प्रदूषणाचा स्तर सातत्याने वाढत आहे. वाहनांची संख्या, औद्योगिक प्रदूषण आणि प्लास्टिकचा वाढता वापर यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे.



**नष्ट होत चाललेली जैवविविधता :** जंगलतोड आणि पर्यावरणातील बदलांमुळे अनेक वनस्पती व प्राण्यांच्या प्रजाती धोक्यात आल्या आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा भविष्यासाठी गंभीर इशारा मानला जात आहे. केवळ झाडे लावून चालणार नाही, ती जगवावी लागतील पर्यावरण दिनी फोटोसाठी झाडे लावली जातात; मात्र त्यांची वर्षभर काळजी घेतली जात नाही, अशी टीका पर्यावरणप्रेमी करत आहेत. झाडे लावण्यापेक्षा ती जगवणे अधिक महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**नागरिक काय करू शकतात?**

झाडे लावा आणि त्यांचे संगोपन करा.
पाण्याचा अपव्यय टाळा.
प्लास्टिकचा वापर कमी करा.
कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर करा.
ऊर्जेची बचत करा.
निसर्गाशी मैत्रीपूर्ण वर्तन ठेवा.

**सरकार आणि जनता दोघांचीही जबाबदारी**

पर्यावरण संवर्धनासाठी शासन विविध योजना राबवत असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि जनतेचा सक्रिय सहभाग तितकाच आवश्यक आहे. पर्यावरण वाचविण्याची जबाबदारी केवळ सरकारची नसून प्रत्येक नागरिकाची आहे.

**जनतेचा थेट सवाल**

फक्त ५ जूनलाच पर्यावरणाची आठवण काढणार, की वर्षातील उर्वरित ३६४ दिवसही पर्यावरणासाठी काहीतरी करणार?

पर्यावरण दिन हा एक दिवसाचा उत्सव नसून जीवनशैलीचा भाग बनला, तरच भावी पिढ्यांना स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि हिरवागार निसर्ग मिळू शकेल. अन्यथा आजची निष्काळजी वृत्ती उद्याच्या पिढ्यांसाठी मोठे संकट ठरू शकते.

# चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री )ची उज्ज्वल कामगिरी



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री ) ने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या डी.फार्मसी उन्हाळी परीक्षा २०२६ मध्ये निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळवले तसेच जास्तीत जास्त विद्यार्थी ७५ % वरील श्रेणीत गुण संपादित केले .

# स्मशानभूमीस विंधन विहीर देत अक्का फाऊंडेशनने मृतात्म्याच्या स्मरणार्थ वाहिली अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर,दि.२२ : औराद शहाजनी येथील मारवाडी स्मशान भूमीत काल अक्का फाऊंडेशन निलंगा व आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या संयुक्त विद्यमाने एक विंधन विहीर घेऊन हनुमानदास लड्डा यांना अनोख्या पद्धतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या स्मशानभूमीत घेण्यात आलेल्या विंधन विहिरीस ३०० फुटावरती ३ इंच पाणी लागले असून तिथे वृक्षारोपण करण्याचा माहेश्वरी समाजाच्या वतीने संकल्प करण्यात आला आहे.

या विधायक कार्यास मधुसूदन बियाणी, पंकज बियाणी, विनोद सोनी, गणेश चांडक, श्रीकांत चांडक, प्रदीप सोनी, भगवानदास लड्डा, आदर्श व्यास, माहेश्वरी समाजाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंदू लड्डा, अजय झंवर, भरत बियाणी, राम बियाणी, घनश्याम मालपाणी, जुगल मंत्री, जुगल बियाणी, संजय बियाणी, अरविंद खंडेलवाल, अमर बियाणी, पुरुषोत्तम झंवर, पवन मालपाणी, लक्ष्मीकांत राठी, अश्विन खंडेलवाल व अक्का फाउंडेशन निलंगा व भाजपा परिवार औराद शहाजनी तर्फे शिवकुमार मंडगे, भगवानदास लड्डा, औराद मंडळ अध्यक्ष अनिल भंडारे, सरचिटणीस चंद्रशेखर शंकद, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष कन्हैया पाटील, राजाराम कहार, इर्शाद पटेल, प्रताप कांबळे, अमोल सूर्यवंशी, नरेश हिरेमठ, सिराज नाईकवाडे, मुश्ताक नाईकवाडे, बाबुस शिंदे, शरद भंडारे या सर्वांचे मोलाचे सहकार्य व योगदान लाभले.



# महायुतीचे नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी:** धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेवर प्रचंड बहुमताने विजयी झालेले भाजपा महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचे निकाल जाहीर होताच भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीच्या वतीने भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून ही निवडणूक एकतर्फीच होणार असे चित्र स्पष्ट होते. लातूर जिल्ह्यासह बीड धाराशिव या तिन्ही जिल्ह्यातून बसवराज पाटील यांना महायुतीच्या नेत्यासह मतदारांनी मोठे समर्थन दिले होते. या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी सकाळी धाराशिव येथे झाली.

धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील हे प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्याचे घोषित होतात भाजपा सह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. याप्रसंगी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून पेढे भरून नवनिर्वाचित विधान परिषदेचे आमदार बसवराज पाटील यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, अभिषेक आकनगिरे, बन्सी भिसे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, वैभव सापसोड, विजय काळे, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

# अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि एडीवायपीयू यांच्याकडून इंडस्ट्री-इंटिग्रेटेड बी.टेक प्रोग्राम लाँच

**लातूर/प्रतिनिधी:** अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (यूजीएसओटी) आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी (एडीवायपीयू) यांनी आज चार वर्षांचा निवासी बी.टेक इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) प्रोग्राम लाँच करण्यासाठी धोरणात्मक सहयोगाची घोषणा केली. विद्यार्थ्यांना सुरुवातीपासून उद्योग-संबंधित एआय इंजिनिअरिंग कौशल्यांसह यूजीसी मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यासाठी हा प्रोग्राम डिझाइन करण्यात आला आहे. पारंपारिक इंजिनिअरिंग शिक्षण आणि एआय-चालित कार्यक्षेत्रातील झपाट्याने बदलणाऱ्या गरजा यांमधील वाढती तफावत दूर करणे या प्रोग्रामचा मुख्य उद्देश आहे. या प्रोग्रामची पहिली बॅच ऑगस्ट-सप्टेंबर २०२६ मध्ये सुरू होणार आहे.

कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळाकडून (सीबीएसई, आयसीएसई किंवा राज्य मंडळे) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) विषयांमध्ये किमान ५० टक्के गुणांसह इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत.

या सहयोगांतर्गत, अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी कॅम्पस पायाभूत सुविधा, निवासी शिक्षण वातावरण प्रदान करेल आणि यूजीसी-मान्यताप्राप्त बी.टेक पदवी बहाल करेल. यूजीएसओटी एडीवायपीयूसोबत सहयोगाने इंडस्ट्री-इंटिग्रेटेड (उद्योगाभिमुख) शिक्षण अनुभव देण्यास मदत करेल. यामध्ये जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान



कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या अभियंत्यांकडून लाईव्ह मार्गदर्शन, दर सहा महिन्यांनी अद्ययावत होणारा एआय-फर्स्ट अभ्यासक्रम, पहिल्या सेमिस्टरपासून प्रत्यक्ष कोडिंग व प्रॉडक्ट-बिल्डिंग स्प्रिंट्स, आणि उद्योग क्षेत्रातील संस्थापक, सीएक्सओ व आघाडीच्या प्रमुखांसोबत नियमित संवाद यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश असेल.

या प्रोग्राममधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अपग्रॅडच्या करिअर सपोर्ट परिसंस्थेचा फायदा मिळेल, ज्यामध्ये ३००० पेक्षा जास्त हायरिंग पार्टनर्स आहेत. तसेच या प्लेसमेंट नेटवर्कने आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान १,१०,००० हून अधिक प्लेसमेंट्स मिळवून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा रोजगार आणि करिअरच्या वाढीचा मार्ग अधिक प्रबळ झाला आहे.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपचे चेअरमन आणि अजिंक्य डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे चान्सलर डॉ. अजिंक्य डीवाय पाटील म्हणाले, अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपमध्ये आमचा नेहमी विश्वास राहिला आहे की, शिक्षण हे भविष्यानुसार बदलले पाहिजे. हा सहयोग शैक्षणिक विश्वासार्हता आणि उद्योग क्षेत्रातील उपयुक्तता यांना एकाच व्यासपीठावर आणतो, ज्यामुळे विद्यार्थी मान्यताप्राप्त पदवी मिळवण्यासह वेगाने बदलणाऱ्या जगात प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्येही आत्मसात करतील.

अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीचे सीईओ विश्वा मोहन म्हणाले, भारतात इंजिनिअरिंगच्या गुणवत्तेची कधीच कमतरता नव्हती, कमतरता होती ती उद्योग क्षेत्राला प्रत्यक्षात काय पाहिजे याच्याशी सुसंगत असणाऱ्या इंजिनिअरिंग शिक्षणाची. ही तफावत दूर करण्यासाठी अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटीसोबत हा सहयोग करण्यात आला आहे: एक खरी पदवी, एक खरा कॅम्पस आणि खरी कौशल्ये ज्यांच्या जोरावर कंपन्या पहिल्या दिवसापासून नोकरी देतात. आम्ही ज्या युनिव्हर्सिटींसोबत काम करत आहोत, तिथे हेच मॉडेल आणत आहोत.

भारतात दरवर्षी जवळपास १.५ दशलक्ष इंजिनिअरिंग पदवीधर तयार होतात, तरीही रोजगाराची मोठी तफावत या क्षेत्रासमोर आव्हान म्हणून उभी आहे. इंजिनिअरिंग हा अजूनही देशातील सर्वात लोकप्रिय करिअर मार्गांपैकी एक असला तरी अनेक पदवीधरांकडे एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि प्रगत सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा अभाव दिसून येतो. भविष्यासाठी सज्ज असलेल्या मनुष्यबळाची मागणी झपाट्याने वाढत असताना अपग्रॅड स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि अजिंक्य डीवाय पाटील युनिव्हर्सिटी यांच्यामधील या सहयोगाचा अशा इंडस्ट्री-इंटिग्रेटेड आणि एआय-फर्स्ट इंजिनिअरिंग शिक्षण मॉडेलच्या माध्यमातून ही तफावत दूर करण्याचा मनसुबा आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तेर येथे R-WE उपक्रमांतर्गत बियाणे प्रक्रिया (Seed Treatment) प्रात्यक्षिक संपन्न




तेर (प्रतिनिधी):-कृषी महाविद्यालय, आळणी यांच्या ग्रामीण कृषी कार्यानुभव (R-WE) कार्यक्रमांतर्गत तेर येथे शेतकऱ्यांसाठी बियाणे प्रक्रिया (Seed Treatment) विषयावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी पेरणीपूर्वी बियाण्यांवर योग्य प्रकारे प्रक्रिया करण्याचे महत्त्व, त्यामागील शास्त्रीय कारणे तसेच बुरशीनाशक, जैविक घटक व इतर शिफारस केलेल्या घटकांच्या साहाय्याने बियाणे प्रक्रिया करण्याची शास्त्रोक्त पद्धत कृषीदूतांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना समजावून सांगितली. बियाणे प्रक्रियेमुळे बियाणे व मातीजन्य रोगांपासून संरक्षण मिळते, उगवण चांगली होते तसेच पिकांच्या सुरुवातीच्या वाढीस चालना मिळून उत्पादनवाढीस मदत होते, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमास रामकिसन कदम, नारायण कदम, दत्ता आंधळे, पांडुरंग कचरे, देविदास गायके, हिराचंद भोरे, अमोल नाईकवाडी यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत बियाणे प्रक्रिया, रोग व्यवस्थापन व पेरणीपूर्व तयारीसंदर्भात विविध प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली.

यावेळी कृषीदूत हर्ष वाघ, समर्थ पाटील, आनंद वीर, ज्ञानसागर पवार, स्वप्निल पासले, शिवम शेळके, रोहित पाटील, योगेश सवने व ऋषिकेश करडे हे उपस्थित होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये शास्त्राधारित शेती पद्धतींबाबत जनजागृती करण्यात आली असून पेरणीपूर्व बियाणे प्रक्रियेचे महत्त्व पटवून देत निरोगी व जोमदार पिकांसाठी आवश्यक

# जागतिक योग दिनानिमित्त धाराशीव भाजपा कार्यालयात भव्य योगशिबीर संपन्न; जिल्ह्यातील सर्व १९ मंडलांत कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती




धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-जागतिक योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज संपूर्ण धाराशीव जिल्ह्यातील सर्व १९ मंडलांमध्ये विविध ठिकाणी भव्य योगशिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य कार्यक्रम धाराशीव येथील भाजपा जिल्हा कार्यालय, 'प्रतिष्ठान भवन' येथे सकाळी ठीक ६:०० वाजता पार पडला. या उपक्रमात जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी अत्यंत उत्साहाने आणि उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

धाराशीव येथील मुख्य योगसाधना कार्यक्रमाला भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, मराठवाडा संयोजक नितीन काळे, ड. नितीन भोसले, ड. अनिल काळे, जिल्हा समन्वयक दिनेश बंडगर, संयोजक डॉ. गोविंद कोकाटे, सह संयोजक डॉ. मनोज घोगरे, सौ. प्रिती कदम, शहर संयोजक प्रमोद बचाटे, आणि शहर सरचिटणीस रोहित देशमुख यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष योग सत्राचे मार्गदर्शन 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे योग शिक्षक लक्ष्मण काकडे व सचिन मोकाशे यांनी केले. त्यांनी उपस्थित साधकांकडून प्राणायाम, सूर्यनमस्कार, विविध आसने आणि ध्यानधारणा (मेडिटेशन) यांचे शास्त्रोक्त पद्धतीनुसार प्रात्यक्षिक करून घेतले. योग केवळ शारीरिक तंदुरुस्ती देणारे माध्यम नसून, ते मानसिक स्थैर्य आणि जीवनात सकारात्मकता आणणारा एक महत्त्वाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन मार्गदर्शन करताना लक्ष्मण काकडे व सचिन मोकाशे यांनी केले.

या प्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या युगात निरोगी शरीर आणि शांत मनासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने आज संपूर्ण जिल्ह्यात सर्व १९ मंडलांमध्ये हा योग साधनेचा उपक्रम यशस्वीपणे राबवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

# युवराज कुऱ्हाडे यांच्या वाढदिवसानिमित्त १०५ दात्यांचे रक्तदान:वही, पेन व स्कूल बॅग शैक्षणिक साहित्यांचे वाटप




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-धाराशिव युवा उद्योजक युवराज कुऱ्हाडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान व गरजूंना मदत अशा सामाजिक उपक्रमांनी दि.२० जून रोजी साजरा करण्यात आला. दरम्यान, मित्र स्व. नितीन मगर यांना श्रद्धांजली अर्पण करून रक्तदान शिबिरास सुरुवात करण्यात आली.

युवराज कुऱ्हाडे यांच्या वाढदिवसानिमित्त धाराशिव प्रशालेतील विद्यार्थ्यांना वही व पेन तर नगर परिषद शाळा क्रमांक ३ मधील विद्यार्थ्यांना वही, पेन व स्कूल बॅग आदी शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर रक्तदान शिबिराचे उदघाटन दीपक देवकते, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे विष्णू इंगळे व शशिकांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते श्री बजरंग बली यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी अशोक कुऱ्हाडे, परवेज सय्यद, समीर तांबोळी, शिवलाल कुऱ्हाडे, नितीन देवकर, अनिल कुऱ्हाडे, अजय कुऱ्हाडे, कृष्णा दुर्लेकर, पवन गायकवाड, मकबूल सय्यद, फुलचंद देवकते, दत्तू कुऱ्हाडे, अमोल देवकर, आकाश ईटकर, मेघराज जाधव, आकाश चव्हाण यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान संकलन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव येथील रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ विशाल नारायणकर, सुश्रुषा अधिकारी नामदेव मुंढे, वैज्ञानिक अधिकारी विष्णू गलांडे, निलाक्षी जानराव, अविनाश रणखांब, जनसंपर्क अधिकारी तिरुपती केंद्रे, गणेश साळुंके, सहाय्यक रविराज गंभीरे तर सह्याद्री ब्लड बँकचे रक्तसंक्रमण अधिकारी अल्केश पोहरेगावकर, महेश तोडकरी व सानिया पटेल तसेच रेणुका ब्लड बँकचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. संजय शिंदे, अभिषेक बद्रे, स्वाती काळे, सृष्टी मस्के, गौरी गुजरे यांनी रक्त संकलनाचे काम केले.

# ताडीच्या नावाखाली विषाचा धंदा; उत्पादन शुल्क विभाग झोपेत की हातावर हात?

धाराशिव (रामेश्वर डोंगरे )-जिल्ह्यात पावडरपासून बनवलेल्या बनावट ताडीचा सुळसुळाट; कारवाईची मागणी जोर धरत आहे

समजलेली माहिती अशी की, धाराशिव जिल्ह्यात ताडी केंद्रांवर राजरोसपणे सुरू असलेल्या संशयास्पद धंद्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नैसर्गिक ताडीऐवजी रासायनिक पावडर व इतर घटकांपासून तयार करण्यात येणारी बनावट ताडी खुलेआम विकली जात असल्याची चर्चा गावोगावी रंगू लागली आहे. मात्र, उत्पादन शुल्क विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने सर्वसामान्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**ताडी नाही, मृत्यूचे पेय!**

धाराशिव, तुळजापूर, कळंब, उमरगा, परंडा, भूम, लोहारासह अनेक भागात ताडी केंद्रांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, अनेक ठिकाणी विकली जाणारी ताडी ही झाडापासून काढलेली नसून रासायनिक पावडरपासून तयार केली जात असल्याचा आरोप होत आहे. यामुळे अनेकांना यकृत, मूत्रपिंड, पचनसंस्था तसेच इतर गंभीर आजारांना सामोरे जावे लागत असल्याची चर्चा आहे.

**उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी नेमके करतात तरी काय?**

जिल्ह्यातील अनेक ताडी केंद्रांवर खुलेआम विक्री सुरू असताना उत्पादन शुल्क विभागाची पथके नेमकी कुठे आहेत, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. एखाद्या ठिकाणी कारवाई झाली तरी काही दिवसांत पुन्हा तोच प्रकार सुरू होत असल्याने कारवाई फक्त कागदावरच का? असा संतप्त प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

**अनेक कुटुंबे उद्ध्वस्त; प्रशासन मात्र सुस्त**

बनावट ताडीच्या आहारी गेलेल्या अनेक व्यक्तींची तब्येत खालावत असून काही जण अक्षरशः शेवटच्या घटका मोजत असल्याचे चित्र आहे. व्यसनामुळे अनेक संसार उध्वस्त झाले असून कुटुंबांवर उपासमारीची वेळ येत आहे. तरीही संबंधित यंत्रणा गप्प का, असा सवाल जनतेतून होत आहे. अखेर ताडी केंद्रांवर धडक कारवाई कधी?

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी संतप्त भावना आता सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे.

# चाकरवाडी अखंड हरिनाम सप्ताहासाठी: कळंबहून १०१ पोते साखरेचा ट्रक रवाना



कळंब (प्रतिनिधी)-सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज, श्रीक्षेत्र चाकरवाडी (जि. बीड) यांच्या २६ व्या पुण्यस्मरणार्थ आयोजित भव्य अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यासाठी कळंब येथील माऊली भक्तांकडून १०१ पोते साखर असलेला ट्रक रविवारी (दि. २१ जून) श्रीक्षेत्र चाकरवाडीकडे रवाना करण्यात आला.

सद्गुरु संत श्री माऊली महाराज समाधी मंदिर, माऊली धाम, श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे २२ जून २०२६ ते २९ जून २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी डॉ. लक्ष्मणराव जाधवर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली माऊली भक्तांनी १०१ पोते साखर जमा केली. डॉ. जाधवर हॉस्पिटल, कळंब समोर झालेल्या कार्यक्रमात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी आप्पा कापसे यांच्या हस्ते साखरेच्या ट्रकचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ट्रक श्रीक्षेत्र चाकरवाडीकडे रवाना करण्यात आला.

गेल्या २६ वर्षांपासून डॉ. लक्ष्मणराव जाधवर हे माऊली भक्तांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताहासाठी साखर पाठविण्याची परंपरा जोपासत आहेत. यावेळी डॉ. लक्ष्मण राव जाधवर, शामराव डिकले, युवराज मुरकुटे, राजाभाऊ ओझा, अशोकराव बोराडे, सुरेश टेकाळे, लक्ष्मण कोल्हे, विजय गुंजाळ, डॉ. अभिजित जाधवर, डॉ. अविनाश जाधवर, विशाल जाधवर, नाना जाधवर, प्रा. व्ही. एस. जाधवर, सम्राट जंत्रे, राजेंद्र बिक्कड, लिंबराज चोंदे, माणिक बोंदर, परमेश्वर शिंदे, प्रा. अजय देशमुख, बापू काळे, माधवसिंग राजपूत, संजय देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने माऊली भक्त उपस्थित होते.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका　२२३९७६
२) रक्तपेढी　२२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन　२४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का.　२२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद　२२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या:यश सरडेचा शाळेच्यावतीने सत्कार

काक्रंबा(प्रतिनिधी)-येथील यश दिलीप सरडे याने अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर भारतीय सैन्य दलात भरती होऊन गाव, कुटुंब आणि शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. त्याच्या या यशाबद्दल काक्रंबा येथील संजीवनी माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शनिवारी (दि. २०) त्याचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा येथील संजीवनी माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी असलेल्या यश सरडे याने घरची परिस्थिती बेताची असतानाही भारतीय सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर त्याने हे स्वप्न साकार करून भारतीय सैन्य दलात स्थान मिळवले. त्याच्या या यशामुळे गावासह शाळेचे व कुटुंबाचे नाव उज्ज्वल झाल्याने विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक राम भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पर्यवेक्षक गोपाळकृष्ण कुरनुरकर, व्यंकट शिंदे, किरण वाघमारे, नितीन पवार, प्रसाद धर्माधिकारी, दयानंद शेरखाने, रामेश्वर राठोड, उमेश पांडागळे, अनिल राऊत, उज्ज्वला माने, पल्लवी ठोकरे, अमिता गुरव, गंगा कळसे, लिपिक अनिल राऊत, तात्या कोळेकर, अजय भिसे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649